डॉ. स्मिता दामले

# काचांची नक्षी

## The caleido

# काचांची नक्षी

## डॉ. स्मिता दामले

ई साहित्य प्रतिष्ठान

# काचांची नक्षी


## डॉ. स्मिता दामले

4212, fishermans Pier Court,
Lutz,
Florida, 33558.
U.S.A.
Emails:
suhasdamle341@hotmail.com
suhas.smita48@gmail.com
Mobile: 9867364634



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तकांसाठी आपले नाव व गाव कळवा)

**प्रकाशन :१ मे २०२३ (महाराष्ट्र दिन)**

©esahity Pratishthan®2023

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. स्मिता दामले



ई साहित्यतर्फ़े आज डॉ. स्मिता दामले यांचे अकरावे पुस्तक, “अस्ताचलावरील तारे” प्रकाशित होत आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान हा अनेक कवी व लेखकांनी सुरू केलेला एक नवीन प्रयोग. मराठी मध्ये वाचक आणि साहित्यिक अधिक जवळ यावेत आणि एक मोठी चळवळ इंटरनेटच्या माध्यमातून सुरू व्हावी अशी इच्छा होती. मराठी भाषेत उत्तम दर्जेदार साहित्य निर्मिती व्हावी, चांगले वाचक एकत्र यावेत, त्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य मिळावे आणि दर्जेदार लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना असे वाचक मिळावेत. एवढेच काय ते आमचे छोटेसे स्वप्न. हिंमते मर्दा. मददे खुदा. आमच्या छोट्याशा स्वप्नाला लाखो वाचकांची आणि दर्जेदार लेखकांची साथ मिळत गेली आणि कारवां बनता गया. डॉ. स्मिता दामले या त्यातीलच एक. “सुर्यपुत्र लोकमान्य” हे लोकमान्य टिळकांचे एक वेगळ्या अंगाचे, त्यांच्या मानवी कंगोऱ्यांचे दर्शन घडवणारे चरित्र, “रक्षा” हा रक्षा या शब्दाच्या विविध सात अर्थांतून निर्माण होणाऱ्या कथांच्या संग्रहानंतर त्यांनी “कलाटणी" हे भारताच्या हजारो वर्षांच्या भव्य इतिहासाचे मिनिएचर दर्शन घडवणारे पुस्तक लिहीले. अशा पुस्तकांनी ई साहित्य चे पुस्तक संग्रहालय समृद्ध होत आहे. त्यांचे “मनसोक्त” हे वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्यानंतर उमटलेल्या तरंगांचे

पुस्तक हे. ई साहित्य तर्फ़े डॉ. स्मिता दामले यांचे हे चौथे पुस्तक. पाचवे पुस्तक होते “इतिहासाची विलग पाने”. इतिहासातील काही महत्त्वाच्या पण कमी प्रसिद्ध अशा घटना व व्यक्तींभोवती हे पुस्तक आहे. पाचही पुस्तके वेगवेगळी आणि तरीही एकाच धाग्यातली. तो धागा म्हणजे इतिहास. आणि त्यातली फ़ुले मात्र दुर्मिळ, अप्रसिद्ध व्यक्ती आणि घटना. सल्तनत ए दिल्ली हे सहावे पुस्तकही याला अपवाद नाही. त्यांचे आठवे पुस्तक कावेरीचा दुभंग: लाही वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

डॉ स्मिता दामले यांना राजकारणाची आवड असल्यामुळे आजवर इतिहासाचा अभ्यास करून त्यातच लेखन केलं. इतिहास म्हणजे पूर्वकालीन सत्ताधीशांच्या यशापयाशाची कहाणी. इतिहास विषयातच त्यांनी Ph.D केलं. इतिहास वाचत असताना त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे १७ व्या आणि १८ व्या शतकातील उत्तर भारतातील राजकारणावर आणि शिंदे-होळकर-मोगल आणि थोरले बाजीराव यांच्यातील सत्तेच्या रस्सिखेचावर विपुल लेखन लिहिलं गेलं आहे. पण १८ व्या शतकात दक्षिण भारतात मोठं राजकारण खेळणाऱ्या संभाजी पुत्र शाहू, पेशवाईचे संस्थापक बाळाजी विश्वनाथ, हैदर अली, त्याचा पुत्र टिपू सुलतान आणि या सर्वांचा लढा झाला त्या प्रबळ इंग्रजांवर मराठीत लेखन झालेलं नाही. म्हणून मनोव्यापाराच्या आधाराने, कादंबरी अंगाने, इतिहास मांडणारं लेखन त्यांनी अभ्यासपुर्वक केलं. ते लेखन म्हणजे, शिवरायांच्या पश्चात संभाजी-राजाराम-शाहू या त्यांच्या तीन वारसांचा आणि पेशवाई शतकाची स्थापना करणाऱ्या बाळाजी विश्वनाथ- पुत्र

बाजीराव - आणि नानासाहेब पेशवा यांच्या कारकीर्दीचा, बाजीरावांच्या मातोश्री राधाबाई ज्यांनी ७५ वर्षाचं दीर्घायुष्य मिळाल्यामुळे राजकारण फार जवळून पाहिलं त्यांना नायिका करून इतिहास सांगणारी "मातोश्री" ही कादंबरी. त्यानंतर त्यांनी मिरजेचे सरदार पटवर्धन यांच्या घराण्याचा इतिहास मांडणारी " उदयास्त " ही कादंबरी लिहीली. त्यांनी लिहीलेलं " मी टिपू सुलतान " हे टिपू सुलतानचं राजकीय, व्यक्तिगत चरित्र प्रसिध्द आहे.

“असं घडलं होतं” व “अस्ताचलाआरील तारे” या नवव्या ४५० पानी व दहाव्या दोनशे पानी पुस्तकात त्यांनी भारताच्या पारतंत्र्याच्या ग्रहण दशेतलं वास्तव मांडलं आहे. ७५० वर्षांच्या साडेसातीतून हे राष्ट्र कसं बाहेर पडलं याचा हा इतिहास आहे. युगानुयुगे, शतकानुशतके, सर्वांना यातून काय घडलं होतं, का घडलं होतं आणि असं घडलं होतं, हे सांगण्याचा हा प्रयत्न आहे.

काचांची नक्षी हे त्यांचे ई साहित्यवरील अकरावे पुस्तक आहे.

ई साहित्य ही संस्था कोणतेही धन देत नसताना त्यांनी आपली दहा मौल्यवान पुस्तकं ई साहित्यच्या वाचकांसाठी विनामूल्य दिली ही आमच्यासाठी डॉ. स्मिता दामलेंची खरी ओळख.

ई साहित्य प्रतिष्ठान डॉ. स्मिता दामले यांचे कायम ऋणी राहील.

**टीम ई साहित्य**

# काचांची नक्षी.

**डॉ. स्मिता दामले.**

suhasdamle341@hotmail.com

suhas.smita48@gmail.com

**आपले नेत्र नलिकेत घालून**
**नलिका फिरवली की त्यातील**
**काचांचे तुकडे नलिकेत फिरतात**
**आणि नवीन चित्र**
**नजरेत येतं. हे इंद्रधनुषी रंग मनात भरतात.**
**या संग्रहातील कथाही अशाच शब्दरंगात**
**बनल्या आहेत. या कॅलिडोस्कोपमधील**
**आकृती जुनं, नवं, आणि पुराणं**
**विश्व दाखवणाऱ्या आहेत.**

**डॉ. स्मिता दामले.**

**८ एप्रिल २०२३.**

ती. कै. आईच्या जन्मशताब्दी निमित्त तिला अर्पण.

तू होतीस, तेव्हा मी लिहिलं नाही.

मी लिहिलं तेव्हा तू थांबली नाहीस.

# कथानुक्रम

थांब ना! नको जाऊस

सीता स्वयंवर

मला जरा कळेल का?

देवच तुमचे रक्षण करो.

माळेचे मागचे मोती.

# थांब ना! नको जाऊस...

गाडीने पंचतारांकित हॉटेलचं पोर्च सोडलं आणि ती घराकडे धावायला लागली. गाडीतले सगळेच गप्प होते..धक्का बसल्यासारखे. पण मनातल्या मनात आपल्याशी बोलत होते. अगदी रेणू आणि जीवनसुध्दा अजून सावरले नव्हते. शांत चेहऱ्याने बसले होते ते फक्त भाऊसाहेब. त्यांना कदाचित याच प्रतिक्रियेची अपेक्षा असावी असं त्यांच्या चेहऱ्यावरून वाटत होतं. शेजारी, यांत्रिकपणे श्रीधर गाडी चालवत होता पण त्याचं मन थाऱ्यावर नव्हतं. त्याला संध्याकाळच आठवत होती. डोळयांसमोरून मधुरा हलत नव्हती. आपण सपशेल हरलो हे त्याला मान्य करणं कठीण जात असावं.

“कमालीची लबाड निघाली मुलगी. ती अशी आहे हे कधी कळूच दिलं नाही तिने आपल्याला. आता ती घरी कधी येणार?” प्रभाताई राग दाबत बोलल्या पण कुणी त्यावर प्रतिक्रिया दिलीच नाही. आवडलं नसावं कुणाला त्यांचं हे बोलणं. नाहीतरी, ती घरी कधी येणार याचं उत्तर माहीतच नव्हतं कुणाला. सगळे बंगल्यात पोचले. आधी रेणू आणि जीवन आत आले. त्यांनी पटापटा दिवे लावले तोपर्यंत भाऊसाहेब आणि प्रभाताईही घरात शिरले. गाडी गराजमधे ठेवून श्रीधरही आत आला. सगळे आपापल्या चपला बूट काढत

सोफ्यावर बसले. तेवढ्यात रेणूची नजर हॉलमधल्या मध्यभागी असलेल्या सेंटर टेबलवर पडली. तिथे एक कागद होता, तो तिने भरभर जाऊन उचलला आणि उघडला. "ममा, भाऊ, मधुराची चिठ्ठी आहे.." त्या कागदाखालचे इतर कागद उचलत रेणू म्हणाली. तोपर्यंत वरच्या मजल्यावर झोपलेला राघवही खाली आला.

"ताईंनी हे कागद मला इथे ठेवायला सांगितलं होतं." राघव म्हणाला.

"मधुराची आणि चिठ्ठी? सगळ्यांना अनपेक्षित असलेला आणखी एक शॉक बसला होता.

"वाच बरं काय आहे... चिठ्ठीपेक्षा बोलली असती तर बरं झालं असतं." संताप आवरत प्रभाताई म्हणाल्या. आज एकावर एक बसलेले धक्के त्यांना पेलले नव्हते.

"जरा गप्प बसाल का?" राग आवरत, संयमाने भाऊसाहेब प्रभाताईंकडे पाहात म्हणाले.

"आण इकडे मराठीत असेल, तुला नाही वाचता यायचं."

"मराठी वाचायला येतं मला भाऊ!" आपल्या मुलांना मराठी वाचता येतं हाही धक्का प्रभाताईंना नवीन होता. इंग्रजी शाळेत शिकणं, इंग्रजीतच घरीही बोलणं, इंग्रजीच मातृभाषा असल्याचं, आणि मराठी वाचता न येण्याचं, कुणालाच त्याच्या घरात दु:ख नव्हतं पण अभिमान मात्र होता. रेणू मोठ्याने पत्र वाचायला लागली.

“आई - भाऊ नमस्कार. आज जे घडणार आहे ते तुमच्या पचनाच्या पलिकडलं आहे, याची पूर्ण जाणीव आहे मला. आज ५ महिने पूर्ण होतील मला तुमच्याकडे येऊन. प्रभाताई, तुम्ही आमच्या कोकणातल्या खेडेगावात आलात. तुमची मावस बहीण आमच्याच गावची. तिला भेटण्याच्या निमित्ताने आलात. तिथे त्या घरात तुम्ही मला पहिल्यांदा पाहिलंत. माझी, माझ्या कुटुंबाची माहितीही तुम्ही काढून घेतलीत. मी सुंदर आहे, माझे लांबसडक केस पाहून, तेव्हाच तुमच्या मनात भावी विचार चक्र सुरू झालं असणार.” प्रभाताईंच्या चेहऱ्यावर आपल्याला नावाने उल्लेखल्यामुळे नाराजी स्पष्ट दिसली.

“त्यानंतर दोन तीन वेळा तुम्ही आमच्या गावात निमित्त काढून आलात, माझ्या आईबापूंशी, भावांशी ओळख करून घेतलीत. गोड गोड, छान छान बोललात आणि एक दिवस माझ्यासाठी सून म्हणून मागणी घातलीत. आम्हाला सगळ्यांना नवल वाटलं. एवढा मुंबईत वाढलेला, उच्चशिक्षित, देखणा, मोठ्या कंपनीत मोठ्या post वर असलेल्या मुलासाठी माझ्यासारख्या खेड्यातील मुलीचा या बाई का विचार करताहेत हे आम्हाला उमगलं नाही. पण गावातली तुमची बहीण आणि मेहूणे सज्जन म्हणून नावाजलले असल्यामुळे, त्यांच्याकडून तुमचं चांगलंच ऐकल्यामुळे, भाऊ आणि तुमची मुलंही छान वाटल्यामुळे, तुमच्या वाईट हेतूंची आम्ही शंकाही घेतली नाही. पण मनात पाल चुकचुकली खरी. माझे आई, बापू तुमचं घर पाहायला मुंबईत आले. लग्नही महिनाभरात झालं. पण लग्नाच्या दिवशी मात्र निर्विकार,

निरुत्साही श्रीधरना पाहिल्यावर मात्र मला काहीतरी गडबड आहे हे जाणवलं. मलाच नव्हे तर आमच्या दादाच्या नजरेतूनही ते सुटलं नाही.

आमच्या कोकणातल्या छोटेखानी गावात छोटं लग्न पार पडलं आणि तुम्ही आणलेल्या मिनि बसमधून आपण सर्व निघालो. एवढं मोठं स्थळ, एवढा देखणा नवरा मिळाला म्हणून, गावातल्या लोकांच्या नजरेत माझ्यासारखी भाग्यवान मीच होते. मी माझं माहेर सोडलं. निघतांना दादाला मी मिठी मारली. त्याला माझी अस्वस्थता जाणवली असावी. तो मला शांतपणे म्हणाला, “कधीही हाक मार, मी धावत येईन. पण आता तुझ्या वकूबाची ही परीक्षा आहे. योग्य ते निर्णय घेऊन, त्यात तू पास होशील याची खात्री आहे मला. मी आणि दादा माणसाला वाचण्यात हुशार आहोत. कारण डोळ्याला डोळा भिडवून श्रीधर एकही शब्द दादाशी बोलले नाहीत.” आम्हा दोघांना भविष्याचा अंदाजाची कुणकुण लागली होती. पण आई-बापूंना काही कळू दिलं नाही आम्ही.

तुमच्या मुंबईतल्या सांताक्रूझच्या बंगल्यात माप ओलांडल्यापासूनच माझ्या परीक्षेची खरं तर सुरुवात झाली. बसमधून बरोबर आलेले सगळे पाहूणे अवतीभवती होते. वरच्या मजल्यावरची आमची बेडरूम तुमच्या मोठ्या मुलीने, संध्याने मला दाखवली. माझ्या मोठ्या मोठ्या गावाकडच्या ट्रंका वरती नेऊन शेजारच्या खोलीत ठेवल्या. मला हे सगळं नवीन होतं. घरातल्या पाहुण्यांची झोपण्याची सोय कुठे तरी कशीतरी प्रत्येक खोलीत केली होती.

त्यामुळे पाहुण्यांच्या गडबडीत विशेष काही जाणवलं नाही. दोन दिवसांमधे सगळे नातेवाईक आपापल्या घरी गेले.

आपलं रोजचं आयुष्य सुरु झालं. तुमची कॉलेजमधली जाणारी दोन मुलं, रेणू आणि जीवन, श्रीधर, आणि तुम्ही दोघं... सोमवार उजाडला. तुम्ही १० वाजता क्लबमधे ब्रिज खेळायला गेलात. भाऊ मॉर्निंग वॉकला बाहेर पडले. मुलं सकाळीच कॉलेजला गेली. आणि श्रीधर ८ वाजता कामाला गेले. मी एकटीच घरात उरले. मग सैपाकाच्या बाई आल्या. काहीतरी शिजवून गेल्या. त्यादिवशी तासातासाने कुणी ना कुणी बाई आत यायची आणि आपलं काम करून माझ्याशी दोन शब्द बोलून जायची. घर तेच चालवत असावेत. मी त्यांची संख्या मोजत बसले.

२ तासांनी भाऊ फिरून आले. दुपारी एकटेच जेवले. मी त्यांना वाढायला उभी राहिले तर म्हणाले, “अशी सवय नाही हं मला. उगीच वाईट सवयी लावू नकोस.” तुम्ही दुपारी आलात मग आपण दोघी जेवलो. जेवतांनासुध्दा तुम्ही फोनवरच होतात...बहुतेक तो फोन संध्याचा असेल. घरात काय चालू आहे, त्याचं रिपोर्टींग तुम्ही करत होतात. कदाचित माझ्याशी प्रत्यक्ष बोलायचं नसेल तुम्हाला. पण दुसरे दिवशी क्लबला जातांना तुम्ही मला तुमची वाट न पाहाता जेवून घ्यायला सांगितलंत. म्हणजे भाऊंनी तुम्हाला सगळं सांगितलं असावं. १० दिवस असंच चाललं. श्रीधर रोजच १० वाजता यायचे. आपण आधीच जेवून घ्यायचो. कधीतरी ते एकटेच जेवायचे आणि आमच्या खोलीत शेजारी दुराव्याने झोपायचे. त्या पहिल्या रात्रीच मला सर्व चित्र स्पष्ट

दिसलं. कारण सकाळी तुमच्या बेडरूममधून तुमच्या दोघांमधली मला कुजबुज ऐकू यायची. तोपर्यंत मला सर्वच अंदाज पूर्णपणे आला होता. माझं मन या नवीन संकटाचा अर्थ लावण्यात गर्क होतं. मी त्या दृष्टीनेच घरातल्या प्रत्येकाकडे पाहायला लागले. लग्नानंतर एक दिवस, माझ्या घरी माझ्या आईबापूंना कळू नये म्हणून दादा हॉस्पीटलमधून बोलला. माझं कसं काय चाललंय याची त्याला चिंता होती. दादाचा फोन आला तेव्हा संध्याताई घरी आल्या होत्या. दर दोन तीन दिवसांनी त्या यायच्याच. माझ्या दादाचा फोन म्हटल्यावर त्या माझ्या जवळपास घुटमळायला लागल्या.

“ठीक आहे सगळं. प्रत्येक चप्पल आपापल्या वाटेने चालते आहे. दावं सोडून खोंड उंडारलं आहे असा अंदाज आहे. त्याला पकडून दावणीला बांधलं तर वाईट काहीच नाही. त्यासाठी विचार करून ओढत आणायला पाहिजे. हॉस्टेलची रेक्टर खंबीर नसली की मुलांच्यात कशी बेशिस्त असते, हा प्रॉब्लेम आहे. एकच वाटतंय की व्यसनं करणारं कुणी नाही.” दादा हसला. “प्रयत्न करून पाहा, तूच निर्णय घे. नाहीतर मग काहीतरी विचार करू.” म्हणाला. संध्याताईंना खोंड-दावं-दावणी, हॉस्टेल, रेक्टर, चप्पल, ही भाषा कळली नाही. त्यामुळे अर्थही लागला नाही. त्यानंतर दोनचार दिवस गेले. श्रीधर मनाविरूध्द लग्न झाल्यामुळे बिथरले होते हे स्पष्ट दिसत होतं. पण त्याचं कारण कळलं नव्हतं. एक दिवस सकाळी श्रीधर गाडीतून बाहेर पडले. शेजारचे शरदही बरोबर होते. दोघेही एकाच ऑफीसमधे असल्यामुळे रोज एकत्र जात होते. मी त्यांच्या वाटेवर पुढे जाऊन उभी राहिले. मी हात करून गाडी थांबवली. श्रीधर थांबले. त्यांनी गाडीची काच खाली केली.

“माझ्या भविष्यासाठी मला एकाच प्रश्नाचं उत्तर हवंय.” मी त्यांना थेट प्रश्न विचारला. काचेतून समोर बघत ते गप्प बसले.

“माझ्याशी हे लग्न नको होतं ते काही physical problem म्हणून की इतर काही…”

त्यांच्या मनात एक ठिणगी उडाली. “ठणठणीत आहे मी!”

No further Question” माझ्या या वाक्यावर त्यांनी काच बंद केली आणि ते निघून गेले. पण त्यांना हा फटका अनपेक्षित होता ते स्पष्ट दिसलं मला. वकिली थाटाचं, अगदी no further सुध्दा त्यांना माझ्याकडून अपेक्षित नसावं. त्यामुळेच गाडी सुरू करायला त्यांना काही क्षण लागले. म्हणजे काहीतरी प्रेमप्रकरण असावं याचा मला अंदाज हवा होता, तो मिळाला. त्याच रात्री आपण सगळेच जेवायला बसलो होतो. आज श्रीधरही होते. मुकाटपणे सर्वजण जेवत होतो. तेव्हा तुम्ही बोलायला सुरुवात केलीत. जेवतांनाच काय, पण केव्हाही कुणालाही बोलण्याचा मक्ता तुमच्याकडेच होता.

“अरे श्रीधर, लग्न झाल्यापासून रोज उशीरा येतो आहेस, तिला कुठेतरी फिरायला तरी घेऊन जात जा. रोज बघते आहे, उशीरा येतोस. जेवतोस आणि झोपतोस.”

मी शांतपणे ते ऐकत होते. तुमचा जीभेचा पट्टा चालू होता. श्रीधर ढम्मपणे जेवत होते. मी मधेच भाजीचं पातेलं रेणूकडे मागितलं तेव्हा तुमचा श्रीधरवर दाबलेला संताप मोकळा झाला. मला तुमच्या बोलण्यात रस नाही हे तुम्हाला कळलं.

“मी तुझ्यासाठी याला बोलते आहे, आणि तू जेवणात दंग आहेस.. ” आपले तपकिरी डोळे आणखी उग्र करत रागाने तुम्ही म्हणालात.

“ऐकतेय मी. या टेबलावर प्रत्येकजण आपल्या आवडीचा पदार्थच फक्त खातोय. नावडत्या भाजीला हातसुध्दा लावत नाहीत.”

“मग?”

“मग काय! मेलेल्या भाजीची ही अवस्था, तर नावडत्या शरीराला कोण कसा हात लावेल.” माझं वाक्य ऐकून सगळे ताठरले की गारठले माहीत नाही..पण फटका बसल्यासारखे चेहरे झाले सर्वांचे… मग मीच बोलायला लागले. “आता मीच बोलते. आपण वास्तवात येऊ या. यांना हे लग्न करायचं नव्हतं हे तर दिसतंच आहे. १५ दिवसांच्या पूर्ण विचारांती आता यातून माझा मी मार्ग काढला आहे. आमचं राहाणं हे ३६ च्या आकड्यासारखं आहे, ते ६३ च्या आकड्यासारखं बनणं भविष्यातही शक्य नाही याचा मला पूर्ण अंदाज आला आहे. मलाही माझ्याशी संसार करायला उत्सुक असलेला जोडीदार हवा होता. पण ते झालं नाही. आता यावर उपाय काय?... मी क्षणभर थांबले. तर, माझे आईवडील, बहीण भाऊ, आणि तुम्ही सर्वजण, यांच्या आयुष्यात आमच्या या लग्नाने काहीच फरक पडला नाही आहे. तुमचं सगळयांचं आधी होतं तसंच व्यवस्थित चालू आहे. अगदी यांचंसुध्दा. माझं आयुष्य मात्र बदललं आहे. माझी आयुष्याची गाडी पटरीवरून उतरली आहे. Derail झालेली ही गाडी कशी रुळावर आणायची ते मी बघीन. गाडी smooth रस्त्यावर असली

की मेंदू पेंगायला लागतो, पण diversion लागलं की प्रत्येकजण सावध असतो. माझं आता तेच असेल.

कोणतेही आईवडील आपल्या मुलांचं वाईट चिंतत नाहीत हे मला माहीत आहे. म्हणूनच आता मी कोणताही टोकाचा निर्णय घेणार नाही. कारण तो माझ्या आईवडिलांना दोष देणारा ठरेल. तुम्हालाही तुमच्या या दोन मुलांची लग्नं करायची आहेत. म्हणून मी याच घरात राहीन, पण पेईंग गेस्ट सारखी. मात्र बाहेरचं कुणीही आलं तर तेव्हा मात्र मी तुमची सून असेन. ते नाटक तुम्हा सर्वांनाही करावं लागेल. पण इथे राहतांना वेळ जायला म्हणून मला तुमच्या या बंगल्याभोवताली बागकाम करायची परवानगी द्या आणि सैपाक करणे हा तुमचा अत्यंत नावडता विषय आहे म्हणून रात्रीच्या जेवणाची जबाबदारी मला द्या. तेवढीच काहीतरी पेईंगगेस्ट म्हणून परतफेड. यावर विचार करा आणि उद्या तुमचा निर्णय द्या.” मी एका पाठोपाठ फटाक्यांची माळ उडवली. सगळेच थक्क झाला होतात माझ्या या विचारांनी. सगळेजण काय प्रतिक्रिया देतात त्याकडे माझं लक्ष लागलं. सगळे गप्प बसले. भाऊंनी जेवण थांबवलं. हातातला घास तसाच धरून रेणू आ वासून माझ्याकडे पाहात बसली. तिला माझं बोलणं खूप आवडलं असावं.

“म्हणजे तुझं सगळं अगदी आधीच ठरलंय. नशीब पळून गेली नाहीस न सांगता. लग्नबिग्न तर नाहीस ना ठरवलंस तेवढ्यात. असलं तर तेही सांगून टाक.” संतापाने चेहरा लाल करत तुम्ही म्हणलात.

"तुम्हाला पोहता येतं का?" मी तुम्हाला विचारलं. "माणूस जेव्हा बुडायला लागतो ना, तेव्हाच स्वत:ला कसं वाचवायचं त्याचा विचार करायला लागतो आणि भरभर निर्णय घ्यायला लागतो. काहीतरी मार्ग शोधायला लागतो. आधी नीट बुडल्यावर मग तळात जाऊन जीव वाचवायचा विचार करूया... असं तो करत नाही. आणि लग्नाचं म्हणाल तर मला आधी या सापळ्यातून बाहेर पडायचंय, आणि मग पुढचा विचार करीन. पण या वेळी माझं मीच ठरवीन माझं लग्न, तेवढं नक्की. ज्याचा माझ्यावर विश्वास असेल त्याच्याशीच करीन लग्न. आणि त्यातून तुमचा तर सल्ला नक्कीच घेणार नाही." माझ्यासारखी खेड्यातली मुलगी १५ दिवसांमधे एवढी धडाधडा तोफ चालवेल याची तुम्हाला अपेक्षा नव्हती. तुमच्या श्रीमंतीला दबून, एक खेड्यातली मुलगी म्हणून, मी गप्प राहीन अशी तुमची कल्पना असावी. त्यानंतर लगेच मी हात आंचवायला उठले. कुणीच काही बोलत नव्हतं. सगळा सन्नाटा झाला होता. त्या रात्री तुमच्या खोलीतून बराच वेळ बोलण्याचा आवाज ऐकू येत होता. साहजिकच होतं ते!

मग मी वरती झोपायला निघून गेले. मला त्या क्षणी अगदी हलकं हलकं वाटलं. दोन दिवस आधीच आमच्या बेडरूमच्या शेजारच्या खोलीत मी माझा मुक्काम हलवला होता. या दोन खोल्यांमधलं दार मी माझ्या ट्रंकांनी बंद करून टाकलं होतं. आणि हॉलमधे उघडणारं दार तेवढं मोकळं ठेवलं होतं. दुसरे दिवशी दादाला हॉस्पीटलमधे फोन करून आमच्या गड्याला, राघवला, काहीतरी निमित्ताने आपल्या घरी पाठवायला सांगितलं. माझी काळजी करू

नकोस, परिस्थिती फार वाईट नाही आहे हेही सांगितलं. पण मलाच सिक्युरिटी हवी होती. चार दिवसांच्यानंतर राघव घरचे तांदूळ, नारळ द्यायला आला आणि मग त्याला ठेवूनच घेतलं आपण. तुम्हालाही बिनपगारी घरगडी म्हणून दाखवायला हवंच होतं कामाला कुणीतरी…

प्रभाताई, एक दिवस अचानक तुम्ही माझे, आईने घातलेले दागिने आपल्या कपाटात ठेवायला मागितलेत. उगीच काळजी नको म्हणालात कारण माझ्या खोलीत कपाट नव्हतंच. मीही लगेच दिले, पण मला ते कधीतरी माझ्या ताब्यात घ्यायचेच होते. त्याचवेळी ठरवलं मी. तुमच्यावरचा भरोसाच संपला होता. मला लग्नात खोटे दागिने घालून तर तुम्ही कमालच केली होती. मी माहेरी निघून जातांना तुमचे दागिने घेऊन जाईन याची भीती वाटली तुम्हाला…? कोण या तुमच्या सल्लागार? मग एक दिवस, तुमच्या क्लबमधल्या मैत्रिणींना तुम्ही माझी ओळख करून द्यायला घरी बोलावलंत. तुम्ही लग्नात घातलेले दागिनेच माझ्या अंगावर होते. तुमच्या मैत्रिणींनी माझ्या बांगड्या बघायला सुरुवात केली. पण ते दागिने १ ग्रॅम सोन्याचे आहेत हे कळलं होतं मला. म्हणून मी मुद्दामच सराफाचं नाव दागिन्यांवर असतं असा विषय काढला आणि माझ्या बांगडीवर बेन नावाचा कुणी सराफ तुमच्याकडे आहे का असं मुद्दाम विचारलं. मी बेन्टेक्स शब्द उच्चारीन अशी भीती वाटून संध्याताई एकदम कावऱ्या बावऱ्या झाल्या आणि घाईघाईने तुम्हाला काही सांगायला आत गेल्या. मग तुम्हीही सैपाकघरातून बाहेर येत, अग, तुझे माहेरचे दागिने दाखव ना असं म्हणत माझा दागिन्याचा डबा मला दिलात. आईने घातलेले माझे सगळे दागिने तुमच्या

मैत्रिणींनी पाहिले. मग मी तुमचे दागिने त्या डब्यात भरले, माझे मी अंगावर चढवले. आता ते दागिने माझ्याकडे आले होते. सराफाचं नाव असतं प्रत्येक दागिन्यावर, पण बेन अक्षरं नव्हतीच त्यावर. आता तुमची हिंमत नव्हती ते दागिने परत मागायची.

प्रभाताई, घर चालवतांना, संसारातले निर्णय खंबीरपणे भविष्य आणि वास्तवावर आधारलेले पाहिजेत ही कुवत तुमच्यात नाही. तुमच्या मुलांचं बरं वाईट भविष्य चालवायला तुम्हाला संसाराची आवड नाही. घरातल्या बाईचं काम असतं ते घर बांधून ठेवण्याचं. तुम्ही तुमचं घर बांधून ठेवलेलं नाहीत, म्हणूनच माझ्या आयुष्याची तुम्ही वाट लावलीत. तुम्हाला तुमच्या मनासारखी मोठ्या नावाच्या घरातली मुलगी सून म्हणून हवी होती. श्रीधरनी निवडलेली मुलगी तुम्हाला मान्य नव्हती. म्हणून मला निवडलंत. गांवकी अडाणी गोरी, गरिबाची मुलगी, सिनेमात दाखवतात तशी नसते, तिला आणून मुलाच्या माथी मारणं म्हणजे प्रश्न संपला हे त्या ३ तासांसाठी करमणूकीचं असतं. पण वास्तवात खेड्यातल्या मुली कुठेच कमी नसतात. तुम्ही मात्र सिनेमातल्या कजाग आईसारख्याच वागलात.

पण ही कोकणातली मुलगी वेगळी आहे. माझे संस्कार, वेगळे आहेत. मला रडायला आवडत नाही. कारण माझ्या भावांनी आम्हा गावातल्या सर्व मुलांना लहानपणापासून किल्ले डोंगर चढायला, शिकवलं आहे. ट्रेकिंग करतांना सरळ सपाट रस्ता कुठेच नसतो. त्यातूनच प्रत्येक पाऊल विचार करून टाकायचं असतं. उतरणीवर सरळ खाली यायचं नसतं. झिगझॅग पावलं

टाकायची असतात. माझ्या आयुष्यातला आलेला हा अडथळाही मी असाच दूर करीन.”

रेणूने घाबरत आईकडे पाहिले. प्रभाताई हातपाय गळल्यासारख्या, रंग उडालेल्या चेहऱ्याने सोफ्यावर बसल्या होत्या. श्रीधर गंभीर झाला होता. भाऊ विचारात मग्न झाले होते. खरंच ही मुलगी खूप वेगळी आहे..त्यांच्या मनात विचार चमकून गेला. काही क्षण गेले. रेणूने मग दुसरा कागद उचलला. हे मी वाचतो, असं म्हणत जीवनने तो कागद हातात घेतला. तुम्हाला एवढं मराठी कधीपासून यायला लागलं.? भाऊंनी आश्चर्याने विचारलं. “मधुरा आमच्याकडून रोज एक मराठी कविता वाचून घ्यायची. आमची मराठी कवितेशी, गाण्यांशी ओळख तिच्यामुळेच झाली.” असं सांगत जीवनने तो कागद वाचायला सुरुवात केली. तो श्रीधरसाठी होता.

“श्रीधर, खरं तर, तुमचं माझं नातं काहीच नाही. दोन गावातले दोन तरूण एकत्र आलो पण आपली ओळखही झाली नाही. तुमच्यासारख्या देखण्या, बुध्दिमान, कर्तबगार एका मोठ्या कंपनीत मोठ्या पोस्टवर असलेल्या तरूणासाठी खेडवळ मुलगी बायको म्हणून मिळणं हा तुमच्या आयुष्यातला अपघात होता, हे मला चांगलं माहीत आहे. तुमच्या भोवती श्रीमंत, मोठ्या घराण्यातल्या श्रीमंत बापांच्या, हिरे माणिक पाचूसारख्या मुलींचा घोळका होता, आणि त्यात माझ्यासारखी रंगीत काच, शोभा देणारी नव्हतीच. पण आपल्या आयुष्याचा गांभीर्याने विचार तुम्ही केला नाहीत. तुमची ही बेफिकीरी मला खड्यात पाडून गेली. आणि या मनाविरूध्द झालेल्या लग्नाचा राग काय

तर माझ्याशी दुरावा. त्यामुळे प्रश्न मिटणार होता का? तुम्ही एवढ्या मोठ्या कंपनीचे सीइओ, पण कंपनीवर संकट आलं असतं तर कंपनीला असंच बाहेर काढलं असतं? या फसवणूकीच्या पायावर हे नातं आधारलं होतं म्हणून नाहीतर असा साथीदार मिळाल्याबद्दल मी भाग्यवानच समजले असते माझी मला.

आपलं लग्न झाल्यावर आपण बसमधून परत यायला निघालो. तुम्ही शेजारी बसला होतात, पण नवीन लग्न झालेल्या वराला जी स्पर्शाची ओढ असते ती तुमच्यात अजिबात नव्हती. तिथेच मी तुम्हाला ओळखायला लागले. पहिल्या रात्री तुम्ही झोपून गेलात. मी काय समजावं याचा विचारही केला नाहीत. फक्त तुमच्याच मनाविरूध्द झालं होतं का हे लग्न? त्या पहिल्या रात्री मी विचार करत बसले, त्यात पहाट झाली. मग पुढचे सगळे दिवस काय मार्ग काढावा यात गेले. कधीतरी वाटायचं की शेजारच्या शरदला तुमच्याबद्दल विचारून माहिती काढावी. पण शेवटी तोही मला परकाच होता. त्याच्यावर तरी कसा भरवसा ठेवायचा? त्यादिवशीच्या जेवणाच्या वेळच्या माझ्या स्पष्ट बोलण्यानंतर रात्री, तुम्ही कितीतरी वेळ सिगरेट ओढत व्हरांड्यात बसून होतात. सिगरेटी संपवून प्रश्न सुटले असते तर आणखी काय हवं? पण प्रश्नाला भिडण्याची तुमच्या इगोमुळे तुमची तयारी नव्हती. मी जेवणानंतर वर शेजारच्या वेगळ्या खोलीत जाऊन झोपले. ते तुम्हाला एकापरीने बरंच वाटलं असणार. मी आधीच शेजारच्या वेगळ्या खोलीत झोपण्याचा निर्णय घेऊन टाकला होता. आता मला माझं मलाच शुध्द रहायचं होतं.

तुमच्या या वागण्यावर उपाय म्हणून, आपल्याला एकांत मिळावा म्हणून, घरातले सगळे २ दिवस लग्नाला गावाला गेले. आपण दोघं आणि राघव घरात होतो पण दुसरे दिवशी सकाळी तुम्ही पिकनिकला निघून गेलात. शेजारचे शरद तुम्हाला न्यायला आले. ते तुमचे बालमित्र, तुम्ही सगळे ऑफीसमधले लोक पिकनिकला जात आहात हे त्यांनीच मला सांगितलं. परत कधी येणार असं मी विचारलं तर उद्या रात्री म्हणाले. जेवायला येणार का? विचारलं, हो! पण आमच्या ऑफिसमधला कँटिनवाला शेट्टी आमचं जेवण इथे घरी आणून देईल.आम्ही आलो की तेच जेवू.. किती लोक आहात.? ८ जणं." शरदनी सगळी माहिती दिली. पण उत्तरं देतांना शरदच्या चेहऱ्यावर अपराधी भावना होती. हे आमचे संवाद तुम्ही आतल्या खोलीतून ऐकत होतात… हे आपले नवराबायको म्हणून संबंध होते. आयुष्यात मनासारखं झालं नाही तर त्यावर कसा मार्ग काढायचा हे तुम्हाला पेललंच नाही. कमी पडलात तुम्ही निर्णय घेण्याच्या क्षमतेत. तुम्ही तुमच्या मतांशी खंबीर राहिला असतात तर हे सगळं घडलं नसतं. तुम्ही निघून गेलात. या नवीन घरात मी कशी राहीन याचा जरासुध्दा विचार केला नाहीत. मला दुखवणं म्हणजे तुमचा आनंद होता. मस्ती होती.

मी आणि राघव घरात राहिलो. खरं तर दोघांनाही भीती वाटत होती. म्हणून आम्ही आतल्या बाजूनेच कुलूपं लावली आणि झोपलो. पण त्यातही माझी परीक्षा झाली होती. कारण पहाटे पाण्याची टाकी भरून वाहायला लागली. टाकीचा नळ कसा बंद करायचा ते मला माहीत नव्हतं. ते रोजचं काम

जीवनचं होतं. मग मीच त्यातूनही मार्ग काढला. टाकीतलं पाणी कमी करण्यासाठी मी आणि राघवने दिवसभरात, पाण्याने घर सगळं धुवून काढलं. घर लखलखीत झालं. टाकीही बरीच रिकामी झाली. नाहीतरी, तुमचं अस्वच्छ घर, या घरात आल्या दिवसापासून मला सलत होतं. तुम्ही सगळे घरी आल्यावर ते सगळ्यांना कळलं पण कुणीच काही बोललं नाही. पण ते जाऊ दे…

तुम्ही गेल्यावर, दुसरे दिवशी सकाळी तुमच्या शेट्टींच्या माणसाचा फोन आला. त्यांच्या वडिलांना अचानक हार्ट अटॅक आल्यामुळे ते जेवण पोचवू शकत नाहीत म्हणाले. राघवने तो फोन घेतला होता. काहीतरी घोटाळा झाला आहे हे मी लगेच ताडलं. मी लगेच त्याच्याकडून फोन काढून घेतला, भरभर निर्णय घेतला… मी घरातली सैंपाकीण बोलते आहे सांगितलं आणि मेनु विचारून घेतला. मग मी आणि राघव बाजारात गेलो, सगळ्या भाज्या आणल्या. रात्रीपर्यंत सगळा सैपाक करून ठेवला. कितीही शत्रू असला तरी, घरी आलेल्या भुकेल्याला घरच्या बाईने जेवायला घातलंच पाहिजे हे संस्कार आहेत माझ्यावर आमच्या घरचे.

रात्री तुम्ही सगळे आलात. तुमची ड्रिंक्स चालू झाली. राघव तुम्हाला सर्विस देत होता. मी वरती माझ्या खोलीत होते. मला ओळख करून द्यायला, जेवायला तुम्ही बोलावलं नाहीत.. गीतेत एक श्लोक आहे. क्रोधात भवती…. जाऊ दे. तुम्हाला नाही कळायचं संस्कृत. पण क्रोधामुळे बुध्दी नाश होतो एवढाच त्याचा अर्थ आहे. तुमचं तेच झालं आहे. खालून बराच वेळ बोलण्याचे आवाज मला ऐकायला येत होते. इतक्यात राघव धावत वर आला आणि

म्हणाला की खाली बसलेल्या दोघीजणी तुम्हाला भेटायला वर येताहेत… मला भेटायला नव्हे राघव, मला बघायला येताहेत त्या….त्यांना १० मिनिटांनी यायला सांग, मी त्याला म्हटलं. म्हणजे तुम्हा सर्वांना मी वर आहे याची जाणीव होती. तुम्ही तरीही मला बोलावलं नाहीत. नंतर त्या तुमच्या दोन भोचक बायका वर आल्या. माझं डोकं चालू झालं. मी काही शो पीस नव्हते. खेड्यातली मुलगी बघायला त्या येणार होत्या. मूर्ख! मी लगेच वेष बदलला. आपल्या कामवाल्या बाईसारखी, मंदाबाईसारखी जुनाट साडी, मोठा कुंकवाचा टिळा, अंबाडा, डोक्यावरून पदर घेतला. मग खेडवळासारखी त्यांच्याशी बोलले. त्यांनी माझी घरची चौकशी केली. त्यांना मी, माझा एक भाऊ कंपांऊंडर, एक भाऊ मास्तर, एक भाऊ कार मेकॅनिक, एक भाऊ काहीच करत नाही, एक भाऊ शेतकरी असे ५ भाऊ आहेत असं सांगितलं तेव्हा मी किती गरीब घरातली मुलगी आहे असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर पसरला. खूप हसू आलं मला. त्यांनी माझा मोबाईलवर एकटीचाच फोटो काढला. काढू देत. खाली बसलेल्या सगळ्या भवान्या फोटोची वाट पाहात असणार कळलं मला. त्या निघून गेल्या. तुम्ही गेल्यावर तुम्ही घातलेला खरकट्याचा राडा मी आणि राघवने साफ केला. ग्रह फिरलेले असले की सगळं खडबडीत आणि ठेचाळणारं वाट्याला येतं… माझी तयारी होती ते अंगावर घेण्याची.

सकाळी ऑफीसमधे गेल्यावर, काल रात्री आपण जेवलो ते माझ्या हातचं होतं, ते तुम्हाला आणि तुमच्या मित्रांना, शेट्टीच्या लोकांमुळे कळलं. संध्याकाळी तुम्ही शरदला घेऊन माझ्याशी बोलायला आलात. मी मागच्या

बाजूला महादेव माळ्याबरोबर बागेसाठी रोप तयार करत होते. जरा अपराधी भावनेने,

"sorry, we behaved badly" **म्हणालात.** मी निर्विकार होते. पण, त्या दिवशी मला पहिल्यांदाच तुमच्याशी उघडपणे शरदसमोर बोलण्याची संधी मिळाली होती. माझ्या बोलण्याचे साक्षीदार म्हणून ते मला हवेच होते. ती संधी मी गमावली नाही.

मी तुमच्याकडे न बघता बोलायला लागले. "तुमच्याशी प्रत्यक्ष बोलायचंच होतं मला. आज हे साक्षीला आहेत तेही चांगलं आहे. मला तुमच्याकडून काहीही नको. आपला शारीरीक संबंधही आला नाही, म्हणजे आपलं लग्नही झालेलं नाही, त्यामुळे तुम्ही निश्चिंत राहा. आपलं लग्न रजिस्टरही करू नका. मला या घराची भविष्यात आठवणही नको आहे, फक्त माझ्या सध्याच्या परिस्थितीचा दोष आईवडिलांवर न जाता माझ्यावरच यावा एवढीच इच्छा आहे म्हणून मी पेइंगगेस्टसारखीच राहते आहे, तुम्हीही माझ्यासारखं नॉर्मल वागलात, स्वत:चं तीळाएवढं दु:ख गोंजारत नाही बसलात, तर तुम्हालाच बरं होईल. तुमचा इगो तुम्ही विसराल अशी अपेक्षा आहे." माझं बोलणं संपल्यावर तुम्ही दोघं निघालात. मी परत तुम्हाला हाक मारली.

"एक सांगायचं होतं. काल तुमच्या भाजीपाल्यासाठी माझे ७५० रु. खर्च झालेत…" लगेच शरदनी पाकीट काढलं. किती पैसे द्यावेत? ते घोटाळ्यात पडले. हुशारीने, त्यांनी ५०० रु. च्या दोन नोटा काढल्या आणि माझ्यापुढे केल्या.

"ठेवा तिथे... त्यांनी ते ठेवल्याबरोबर मी तुम्हाला म्हटलं की, यातली ५०० रु. ची नोट राघवला बोलावून त्याला द्या. आमच्या मित्रांनी तुला शर्ट घ्यायला पैसे दिलेत म्हणा. कालच्या सर्वीसची टिप म्हणू नका. काल त्याला तूही जेवून घे तरी म्हणालात का? तुमच्याठी तो दुपारपासून रात्रीपर्यंत खपला होता." तुमचे दोघांचे चेहरे आणखीनच पडले. तुमचं काय झालंय, की स्वत:च्या success, salary, या धाग्यांच्या पॅराशूटमधे तुम्ही इतके अडकला आहात की त्यामुळे स्वत:च्या आयुष्यासाठीही तुम्ही जमिनीवर उतरला नाहीत. तुम्हाला दुसऱ्यांच्या विचाराची मनाला सवयच नाही आहे" माझं एवढं धाडधाड बोलणं, थोडं सफल झाल्याचं दुसरे दिवशी पाहायला मिळालं. त्यादिवशी पासून तुम्ही घरी लवकर यायला लागलात. रात्री सगळयांबरोबर टी. व्ही पाहायला लागलात...जेवायला लागलात. मी आणि मुलं आधीच जेवून घेत होतो, त्यातले पदार्थही खायला लागलात. माझी चुकीची समजूत असेल कदाचित पण तेव्हापासून तुम्ही मी असलेल्या जागी माझ्याजवळ, वरचेवर यायला लागलात...तुमचे माझ्यावर रोखलेले डोळे मला सैरभैर करायला लागले.

पण सत्यनारायणाच्या दिवशी मात्र माझाही थोडा संयम सुटला. लग्नानंतर देवाचं काहीतरी कर, सत्यनारायण, बोडण कर म्हणजे सगळं सुरळीत होईल असा कुणीतरी तुमच्या आईला सल्ला दिला. त्याप्रमाणे आपल्या घरी सकाळी सत्यनारायण, आणि पाठोपाठ बोडण पार पडलं. सकाळी मी नऊवारी साडी नेसले होते. सगळे दागिने, नथ घातली होती. तुमची माझ्यावर सतत नजर

खिळत होती. बोडणाच्या वेळी, त्या अंगात आलेल्या काकू आल्या. त्यावेळी घडलेल्या प्रसंगानेही तुम्ही बदलला होतात. संध्याकाळी लग्नाला न बोलावलेले आमंत्रित, तीर्थप्रसादासाठी बोलावले होते.

ते येतील म्हणून मी तुमच्या खोलीतली माझी साडी घ्यायला आता आले. तुम्ही तिथे नव्हतात. पण मी निघतांना तुम्ही दाराशी आलात. समोरासमोर इतक्या जवळ येण्याची ती पहिलीच वेळ होती. तुम्ही तुमच्या अस्मानी सिल्कच्या झब्ब्यात तुमच्या निळया डोळयांमुळे, इतके सुंदर दिसत होतात की मला त्याक्षणी यक्ष किंवा मदनाचा पुतळा म्हणतात तो असाच असेल असं वाटलं. मी खिळल्यासारखी तिथेच तुमच्यासमोर उभी राहिले. माझा पाय निघेना. मी तरूण आहे याची जाणीवही मोठी लाघवी होती. तुम्हीही त्या मोहात गुंतून पडलात.. असे किती क्षण गेले कुणास ठाऊक, पण तुमचा मोबाईल तुमच्या मदतीला धावून आला. तो वाजला आणि मी भानावर आले. माझ्या अंगातले सगळे तरूण रस क्षणात वाहून, गळून गेले... तुम्ही आत गेलात आणि मी बाहेर पडतांना तुम्हाला म्हटलं, सॉरी, असं परत घडणार नाही... दुसऱ्याची वस्तू वापरण्याचा माझा स्वभाव नाही." माझ्या खोलीत आल्यावर तो चढलेला ताप उतरायला बराच वेळ लागला. मी नॉर्मल झाले आणि खाली गेले.

मग संध्याकाळ सगळी बिनसलेलीच गेली. कुणाला कळू न देण्याची कसरत करत मी वागले. तेवढ्यात तुमचे ऑफीसचे लोक आले. भाऊ, रेणू, जीवन सगळे त्यांच्याशी बोलण्यासाठी जमले. माझी ओळख भाऊंनीच करून दिली. तेव्हा सगळयांच्या चेहऱ्यावर एक चमत्कारिक भाव उमटला. त्यातल्या

एकाला तो आवरला नाही. त्याने आपला मोबाईल काढून माझा त्याच्याकडे आलेला फोटो दाखवला. आणि Is that you असं विचारलं. तेव्हा मीही Oh! ya, it's me म्हटलं. आणि मग त्यांच्या मनातलं कुतुहूल शमवावं म्हणून मी थोडं इंग्लीश थोडं मराठीत त्यांना सांगितलं, की मी खेड्यातली मुलगी आहे. We don't have smooth roads, smooth vehicles, smooth footpaths. We walk on a 10 feet wide road, जिसे पगडंडी केहेते हैं ना! आपण पाऊलवाट म्हणतो. these roads run along the farms, mango groves or barren lands. when we walk on these roads, sometimes, snakes or serpents, turtle or tortoise, ducks, or cranes ये सब हमारे साथ चलते हैं. आम्ही शेताजवळून, आंबराईजवळून पाऊलवाटेने चालत जातो, तेव्हा ते प्राणीही अचानक कधीतरी आमच्यासमोर रस्त्याच्या पलिकडे जायला टपकतात. Sometimes these creatures pop up in front of us to cross the road. तेव्हा आम्ही दोघेही थांबतो, we judge each other's intentions and then act. कधीकधी कॉमोफ्लेजचा वापर करतात ते. तुमच्या बायका मला बघायला आल्या होत्या, भेटायला नाही… मग मलाही माझी ओळख लपवायची होती. माझे ५ भाऊ आहेत. त्यातला एक न्युरो सर्जन आहे, एक ऑटोमोबाईल इंजिनियर आहे, आमची गाड्यांची शोरूम आहे, गराज आहे. बिघडलेल्या गाड्या तिथे दुरुस्तीला येतात. हायवेवरून जाणाऱ्या गाड्याही कधीकधी तिथे थांबतात. माझा एक भाऊ पुण्यामधे गणिताचा प्रोफेसर आहे. एक सोशल वर्कर आहे…सगळ्यांनी आमच्या गावाजवळच आपापले व्यवसाय उघडले आहेत. तुम्हाला माझे भाऊ,

कंपांऊंडर, मेकॅनिक, मास्तर अशी माहिती मिळाली असेल. सगळे निमूटपणे ऐकत होतात. सगळे अवाक्, गपगार झाले होते. मग मीही तिथे फार वेळ थांबले नाही. तेवढ्यात तुमचे शेट्टी आले. त्यांना मी शांताबाई अशी माझी ओळख सांगितली. त्यांनी आपले कान पकडत माझी क्षमा मागितली. त्यांचा दोष काहीच नव्हता. मीच त्यांच्याशी बोलतांना मी घरातली सैंपाकीण असल्याचं सांगितलं होतं. मात्र, त्या दिवशी लोकांसमोर नवीन लग्न झालेल्या नवऱ्यासारखे वागत होतात. जरा जास्तच जवळ येत होतात. तुमचा स्पर्श मला सुखावत होता.

तुमच्यात थोडा बदल झाला होता. तुम्ही माझ्याशी जरा अदबीने बोलायला लागलात. पाहुणे आले तर तर नवऱ्याची भूमिका करायला लागलात. घरासाठी जास्त वेळ द्यायला लागलात. माझ्याजवळ यायची संधी शोधायला लागलात. आमच्यात बसून पत्ते, कॅरम खेळायला लागलात. पण मला माझ्यावर प्रेम करणारा जोडीदार हवा आहे. तो तुमच्याकडे आहे की नाही माहीत नाही. आता आपले संबंध संपलेत. तुमच्या हाय-फाय लाईफ स्टाईलमधे मला रस नाही. हिरे-माणकं मी माझे मी कमावीन तेव्हाच घालीन. बापाच्या पैशावर दागिने मिरवायचा स्वभाव माझा नाही.

बाय द वे, माझ्या अंदाजाप्रमाणे तुमचं लग्न न करण्याचं कारण काल मला पाहायला मिळालं असं वाटतंय. तुम्ही तुमचं चालू असलेलं आता, आयुष्य खुलेपणाने जगू शकता. माझी घसरलेली गाडी मी रूळावर आणली आहे. खेड्यातली माणसं म्हणजे सामान्य, श्रीमंत वस्तीतली सगळी फार हुशार

हा तुमचा भ्रम मी पार मोडला याचा मला जास्त आनंद आहे. माझ्या भावांनी विचारपूर्वक आपापल्या फिल्डसाठी खेडं निवडलं आहे. माझ्या वडिलांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतल्यावर हे मुद्दाम स्वत:चं गावच मुद्दाम निवडलं आणि तिथे सुधारणा केल्या. उद्या या घरात मी नसणार म्हणून सगळं स्वच्छ सांगून जात आहे."

सगळे स्तब्ध झाले. गंभीर चेहऱ्याने सोफ्यावर बसले. विचारात गढले. श्रीधरचा चेहरा अपराधी वाटत होता. थोड्या वेळाने रेणूच भानावर आली. तिने टेबलाकडे पाहिलं. टेबलावर अजून काही कागद होते. ते तिने उचलले. हे आमच्यासाठी आहेत. भाऊंकडे पाहात ती म्हणाली. वाचू.? हो! वाच ना! उतावीळपणे जीवन म्हणाला.

जीवन, रेणू आणि जिनी…. Thank you for making my life happy and enjoyable. तुम्ही दोघं त्या घरात होतात म्हणून ५ महिने जिवंतपणा होता. नाहीतर प्रत्येकजण आपापल्या रडण्यात गर्क होता. दुसरे दिवशी मला भाऊंनी माझी बागकाम आणि सैपाकाची मागणी मान्य केली असल्याचं सांगितलं. त्या रात्री मी तुमच्याबरोबर न बसता आधीच जेवून घेतलं. तुम्हाला त्याचं कारण सांगितलं की मला प्रसन्न वातावरणात जेवायला आवडतं. लांब चेहऱ्याने, गंभीर वातावरणात जेवणं आवडत नाही मला. मग तुम्ही दोघं मला जॉईन झालात.. आपण हसत खेळत गप्पा मारत जेवायला लागलो. मी तुम्हाला विचारून पावभाजी, इडलीडोसे, भेळ, खीमा-पाव, असे रोज वेगवेगळे पदार्थ करायला लागले. खरं तर भाऊंनाही तेच आवडायचं. मग

ते थोडं आपल्यातलं खाऊन नंतर भाजीपोळीचं जेवायला जात. मला शाळा-कॉलेजचं सगळं नवीन विश्व तुमच्यामुळे कळायचं. मग आपली गँग तयार झाली. गच्चीत बसून कॅरम, पत्ते, सुरू झाले. मी तुम्हाला ब्रिज आणि बुध्दिबळ खेळायला शिकवलं. तुम्ही अभ्यासाला पहाटे उठून बसलात की कॉलेजला जायच्या आधी मी तुम्हाला गरम गरम चहा आणि ब्रेकफास्ट द्यायला लागले. कोणत्याही परिस्थितीत रडायचं नाही हे रेणूच्या घाबरट स्वभावाच्या वेळी परत परत सांगितलं. रडण्यापेक्षा समोरच्या माणासातला वीक पॉइंट शोधून, त्याला पलटवण्यासाठी कशा युक्त्या योजायच्या, ते शिकवलं. राघवही आपल्यात सामील झाला. कोकणातले आमच्याजवळचे गड किल्ले कोकण याची माहिती तुम्हाला द्यायला लागले.

पहिले दिवशी तुम्ही दोघं कॉलेजमधून आल्यावर जिनीही मला बघायला आली. तिच्या परीक्षेमुळे ती लग्नाला येऊ शकली नव्हती. “जिनी म्हणजे काय नाव?” मी विचारलं. “सरोजिनी. तिला सरोज नाव नाही आवडत, म्हणून तिने जिनी नाव निवडलं.” तुम्ही दोघांनी मला माहिती पुरवली. मग तीही आली आपल्या ग्रुपमधे. ती रेणूपेक्षा जास्त चतुर, शहाणी होती, म्हणून रेणू तुम्हाला एक छान खाद्य झाली होती. शरद मात्र लांब असायचे. श्रीधरची मैत्री त्यांना बांधून ठेवत असावी कदाचित. मग मी जिनीच्या घरातही रुळले. तिच्या आईला मोदक करायला मदत करायला लागले. त्यांच्या भजनी मंडळाला पेटीची साथ करायला लागले. त्यामुळे कितीतरी बायकांची माझी ओळख झाली. एक दिवस पाऊस पडला तर, मी गच्चीत गेले. तुम्हीही आलात. आपण

मस्त भिजलो. मग मी खाली जाऊन गरम गरम कॉफी आणली. एकदा रात्री तुम्ही तिघं गच्चीत जाऊन बसलात. मी एका भांड्यात भेळ कालवून आणली होती. पौर्णिमा होती ना त्या दिवशी. आपण भेळ खाल्ली. खूप मजा केली मी तुमच्याबरोबर...आणि मग ती बोडणाच्या वेळी अंगात आलेल्या बाईंची आपण केलेली फजिती... त्या दिवशी रात्री गच्चीत बसून, सकाळपासूनच्या गप्पा रंगल्या होत्या... आपल्या गप्पा रंगल्या तेव्हा शरद तिथे आले. त्यांना सकाळीच आपल्या कटकारस्थानाचा वास लागला होता. पण आपण त्यांना पत्ता लागू दिला नाही. आताही कुणाला कळायला नकोच...आता त्याचा उपयोगही नाही. तुमच्याबरोबरचे दिवस कधीही विसरणार नाही."

रेणूच्या डोळयांमधे पाणी यायला लागले. तिने कागद ठेवून दिला. आणखी २ पानं आहेत... जीवन ते कागद उचलत म्हणाला. "भाऊ, तुमच्यासाठी आहेत हे. वाचू?"

"वाच.... जो निघून जातो त्याला निरोप देत असतात.. ही मुलगी वेगळीच आहे. तिनेच आपल्याला निरोप दिलाय...." भाऊ खिन्नपणाने म्हणाले.

"भाऊ, काय म्हणू, काय लिहू तुमच्याबद्दल? माझ्याजवळ शब्द नाहीत... तुमच्यामुळे, मला माझ्या बापूंची उणीव कधीही भासली नाही. पहिले दिवशी घरातली सगळी निघून गेली, तुम्हीही रोजच्यासारखे तुमच्या मॉर्निंग वॉकला जाऊन आलात. तेव्हा नव्या नवरीसारखी मी तुमच्यासमोर आले. काही करून देऊ का असं विचारलं. नको म्हणालात. मग मीही काय करावं या

विचारात उगीचच हॉलमधे बसून राहिले. ते टी. व्ही बघायला लागले तेव्हा मीही पाहायला लागले. मग एकटेच जेवायला बसलात.“तुझं झालं जेवण?

“नाही…आई येतील ना?”

“तिने तुला काही सांगितलं नाही?”

मी मान हलवली. तुमच्या चेहऱ्यावर नाराजी उमटली. पण दुसरे दिवशी प्रभाताई क्लबला निघाल्या तेव्हा त्याचं उत्तर मला मिळालं. बाई सैपाक करून गेल्या की तुला भूक लागली की तू जेऊन घे. कालच्यासारखी माझ्यासाठी थांबू नकोस. माझं क्लबमधे खाणं होतं.” त्या निघून गेल्या. तुमच्या जेवणाच्या वेळी मी तुमच्याबरोबरच जेवायला बसले. तुम्ही जेवत राहिलात आणि मला माझ्या घरच्यांबद्दल विचारत राहिलात. मग रोजच आपल्या गप्पा चालू झाल्या. एक दिवस तुमचे एक मित्र अचानक तुम्हाला भेटायला आले. तुम्हाला दोघांना मी चहा करून दिला. त्यांच्यासाठी पोहे वगैरे काही करू का विचारलं ते तुला येतात का पोहे करायला म्हणालात मी हो म्हटलं. मी पोहे केले. हळूहळू आपल्या दोघांमधलं तणावाचं अंतर कमी व्हायला लागलं.

“आता सून आली आहे, त्यामुळे तुमच्याकडे पोहेही मिळायला लागलेत….” तो खवट माणूस जातांना कुजकट बोलून निघून गेला.

सकाळच्या फेरीनंतर तुमच्याबरोबर, तुमच्या घरी येणाऱ्या मित्रांची संख्या वाढायला लागली. चहा व्हायला लागला. मी रेणू, जीवनला सकाळी जो ब्रेकफास्ट देत होते. त्यात भर पडायला लागली. तुमच्या गप्पांचा फड घरात

रंगायला लागला. एक दिवस तुमच्यात कांदा भजीचा विषय निघाला तेव्हा कांदाभजीही मी दुसरे दिवशी तुम्हा सर्वांसाठी करून ठेवली. मग तेही मित्र माझ्याबरोबर बोलायला लागले. घरची चौकशी करायला लागले. सकाळी एवढं बोलणारे तुम्ही दुपारनंतर मात्र गप्प असायचात… मग रात्री आमच्यातलं काहीतरी खायचात आणि माझ्या मित्रांनाही हे कर असं हळूच सांगायला लागलात. माझं बागकाम पाहून खूष व्हायला लागलात. तुमच्या बेडरूमच्या बाहेर मी रातराणी लावली. भाऊ, काही दिवसांनी याला फुलोरा येईल, मग रात्र सुगंधी होईल तुमची! मी तुम्हाला म्हटलं. तुमच्या डोळ्यांमधे पाणी नव्हतं एवढंच. मला त्यादिवशीपासून माझ्या बापूंची आठवण येणं कमी झालं. आईला फोन कर असं म्हणायला लागलात, पण मी कधी नाही केला घरी फोन. त्यांचाच आला तर तुम्हा सगळ्यांच्यात येऊन त्यांच्याशी बोलायचं मी आवर्जून करत होते.

मी दुपारी माझ्या खोलीत बसून माझ्या लॅपटॉपवर बसून काहीतरी बघत असे. मुलं आली की त्यांच्याबरोबर माझ्या गप्पा चालत. माझ्याकडे लॅपटॉप आहे, हे कुणालाही माहीत नव्हतं आणि तो कुणालाही दिसलाही नसता. तुमच्या कुणाची अपेक्षाच नव्हती माझ्याकडून या लॅपटॉप वापरण्याची. माझ्या खोलीत कुणी यायचंच नाही. एक दिवस मात्र माझं भांडं फुटलं. टी. व्ही. वर टोरा टोरा लागला होता. मी आणि मंदाबाई सिनेमा पाहात बसलो होतो. भाऊ जवळपास आहेत हे मला माहीत नव्हतं. मंदाबाईंना काहीच कळत नव्हतं. मी त्यांना सिनेमाची गोष्ट सांगत सिनेमा पाहात होते. इतक्यात विमानाचे पायलट

जपानी भाषेत बोलले. ते काय बोलले ते मी मंदाबाईंना सांगितलं. आणि मला धक्का बसला. पाठीमागे तुम्ही उभे होतात. मला जपानी येतं हे तुम्हाला नव्यानेच कळलं होतं आणि तुम्हालाही ते आश्चर्याचंच होतं.

“तुला जपानी कसं काय येतं.? तुम्ही थेट प्रश्न विचारला.

“शिकले आहे मी.” घाबरून मी म्हटलं.

“मग त्याचा उपयोग करत नाहीस?”

“हो! घरी असतांना कॉर्पोरेट कंपन्यांना इंग्लीश भाषांतर करून देत होते.”

“मग आता बंद का आहे?”

मी काहीच बोलले नाही. “तुमच्या घरात चालेल?” मी म्हटलं. पण मन थाऱ्यावरच नव्हतं माझं हे कसं म्हणणार?

“खरं आहे! तुमच्या घरात म्हणालीस त्यातच सर्व आलं. आता असं कर. तुझं काम चालू कर.”

“पण घरात कळलं तर?”

“घरात कुणाला कळायला नकोच आहे. तुला काय मदत लागेल ती मी करीन. तू काय काय करू शकतेस ते कर.”

“मी आता मुंबईत आले आहे. त्यामुळे interpreter म्हणून जपानी प्रवाशांबरोबर हिंडू शकते. त्यांच्याबरोबर कंपन्यांमधे बोलायला जाऊ शकते. घरी बसून जे मी आमच्या घरी बसून करत होते, तेही इथे बसून करू शकते.”. तुम्ही सगळं ऐकत होतात. मग थोडे थांबलात आणि विचारलंत,

“फक्त मला एकच खरं खरं सांग…तुला श्रीधर आवडतो?” मी मान वर करून त्यांच्याकडे पाहिलं आणि हो म्हणून मान हलवली. “आणि राग, चीड?”

“इतक्या देखण्या, कर्तबगार पुरूषाला कोणती मुलगी नाही म्हणणार? आणि चीड? खरं तर त्यांच्याकडून मला सन्मान नाही हा मोठा डंख आहे माझ्या मनात. या घरातल्या सगळयांचा प्रॉब्लेम काय आहे माहीत आहे का भाऊ, आपण फार श्रीमंत आहोत म्हणजे जसं वागायला पाहिजे, जेजे करायला पाहिजे ते सगळं केलंच पाहिजे या खोट्या कलाबुतीच्या धाग्यात गुरफटले आहेत. हे सगळे स्वत:शीच खरे नाही आहेत. मी मुलांना भाकरी पिठलं एक दिवस जेवायला केलं तर मिटक्या मारत जेवले दोघं. पण हायफाय लोकांनी पोळीचा लाडू, फोडणीचा भात, खायचा नसतो, सँडविचच खायचं या खोट्या विळख्यात अडकली आहेत ही सगळी… मला त्यामुळे गुदमरायला होतंय… असं खोटं आयुष्य नाही मला जगायचं. माझे भाऊही परदेशात जाऊन शिकून आले, पण त्या हवेच्या, संस्कृतीच्या गोळया खात जगत नाही आहेत. खरं तर हे काही फार गंभीर प्रकरण नाही. पण त्यांची ओळखच नाही आहे, त्या विश्वाशी”. मग तुम्ही गप्पच बसलात. पण खूष झाल्यासारखे वाटलात.

“भाऊ तुम्ही मला केवढं प्रोत्साहन दिलंत. मला कंपन्यांचं भाषांतराचं काम मिळायला लागलं. दिवसभर माझं काम करायचं. खोलीत बसून लॅपटॉप वापरायचा. मुलं आली की माझ्या खोलीतला लॅपटॉप कपाटाच्या खाली जायचा. मग हा दिवस एखाद्या सस्पेन्स सिनेमातल्या अचानक टर्नसारखा उगवला. श्रीधरच्या कंपनीशीच एक जपानी कंपनी बिझनेस डील करणार होती हे मला त्या जपानी कंपनीला भाषांतर करुन देतांना कळलं. त्या कंपनीला मोठ्या हॉटेलमधे करार झाल्यानंतर पार्टी आहे हेही मला कळलं. जपानी कंपनीला त्यांची भाषा बोलणारा कुणीतरी interpreter हवा होता. मला त्यांची interpreter म्हणून जायची संधी मिळाली. पण ती घेऊ की नको, या घोळात मी पडले. मला भीती भाषेची नव्हती तर श्रीधरना पाहिल्यावर मला हिंमत राहील की नाही याची भीती होती. ही संधी सोडू नये हेही पटत होतं. माझ्या मनात धडधड सुरू झाली. जायचं का श्रीधरच्या कंपनीत जपानी लोकांच्या तर्फे? मग मी दादाला फोन केला. त्याने ही संधी गमावू नकोस असं बजावलं. माझं लक्ष उडालं.

माझं मन थाऱ्यावर नाही हे भाऊ, तुम्ही लगेच ओळखलंत. तुम्ही खोदून खोदून विचारलंत, मला बरं वाटत नाही आहे का, माहेरी जायचंय का, पैशाची काही काळजी आहे का, किती तऱ्हेने तुम्ही माझी काळजी केलीत भाऊ. तेव्हा तुम्हाला फसवणं अशक्य झालं मला. मी खरं खरं सगळं सांगितलं. भाऊ, तुम्हीही गंभीर झालात. विचारात पडलात आणि संध्याकाळी मला म्हणलात, की ताबडतोब हा चान्स हातात घे. श्रीधरला धडा शिकवायला ही

संधी उत्तम आहे. सगळ्यांना आश्चर्याचा धक्का दे. तुझ्या परमपूज्य सासूलाही खेड्यातली मुलगी म्हणजे काय असू शकते ते कळलं पाहिजे. भाऊ, तुम्ही माझ्या मनातलंच बोलत होतात. मग मात्र मी हे मुलांनाही सांगणार असं तुम्हाला बजावलं. तुम्हीही ते कबूल केलंत आणि त्यांनाही सिक्रेट ठेवायला सांगितलंत.

मी अतिशय सुंदर कपडे आणि थोडासा मेकअप करून गेले होते. कानात दोन मोठे मोती, बंद गळ्याचा सिल्कचा टॉप आणि मॅचिंग प्लिटेड असा लांब स्कर्ट... ..त्यावर माझ्या लांबसडक दोन वेण्या. मी घरून निघाले तेव्हा घरात फक्त तुम्हीच होतात. माझा हा ड्रेस पाहून चकित झालात. निघतांना मी तुम्हाला वाकून नमस्कार केला. तुमच्या डोळ्यांमधे कमालीचं कौतुक होतं. माझ्या पाठीवर हात ठेवत, म्हणालात,

“जा, तू नक्की विजयी होऊन येशील याची पक्की खात्री वाटते आहे मला. येतांना माझ्या अतिशहाण्या मुलाला घरी आण”.

परवा आणि काल, दोन दिवस मी श्रीधरच्या ऑफीसमधे जपानी लोकांबरोबर गेले. पाहुण्याचं स्वागत करायला ऑफीसमधे सगळे उत्सुक होते. मोठं कॉंट्रॅक्ट मिळणार होतं कंपनीला. आम्ही लिफ्टने वर गेलो. पाहुण्याचं पुष्पगुच्छाने स्वागत झालं. मी बोलायला सुरुवात माझी ओळख सांगितली. श्रीधर आणि शरदने माझ्याकडे पाहिलं आणि ते गार झाले असावेत. मी त्यांचीही रीतसर ओळख करून दिली. त्यांची ओळखही दाखवली नाही. जितका वेळ तिथे होते तितका वेळ श्रीधरकडे कारणाशिवाय बघितलंही नाही.

दुपारभर त्यांच्याबरोबर राहिले. इंग्लिश आणि जपानी, दोन्ही भाषांवरची mastery दाखवली. ते दोन दिवस हॉटेलवरच राहिले.

आज श्रीधरच्या ऑफीसचा पार्टीचा दिवस उजाडला आहे. तुम्हालाही सर्वांना आज त्या पार्टीला यायचं होतं. मी काल रात्री बसून तुमच्या सर्वांच्या निरोपाचे हे कागद लिहून ठेवले आहेत. आता मी घरी जायला हवं. माझा इथला रोल संपलाय. जास्त ताणून ठेवण्यात काय अर्थ? नाही का बापू? आमच्या दोघांमधली काचेची भिंत आहे, त्यातून एकमेकांना दिसतो पण जवळ येऊ शकत नाही. त्यातून कधीतरी बाहेर पडायलाच हवं. मला वाटतं, मी काय आहे हे तुम्हा सर्वांना सांगून झालंय. मलाही आता माझं आयुष्य सुरू करायचं. मी आता घरच्यांना सांगू शकते की माझे आणि श्रीधरचे सूर कधी एकत्र लागलेच नाहीत म्हणून मी परतले आहे.”

कागद संपले. सगळे विचारात गढले. इतका वेळ सगळी पत्रं ऐकणाऱ्या प्रभाताईंचा चेहरा काय ऐकलं ते खरं का या विचाराने गोंधळात पडला होता. अपराधी झाला होता. काय बोलावं ते त्यांना कळत नव्हतं. भाऊ श्रीधरकडे पाहात होते. मान खाली घालून श्रीधर हात चोळत बसला होता. मनातला अपराधी भाव लपवण्याचा प्रयत्न करत होता. आपलं फार चुकलं याची चुटपुट त्याच्या चाळवल्या जाणाऱ्या बोटांच्या हालचालींवरून भाऊंना कळत होती.

“बरं झालं, श्रीधरची बला गेली. आता तुम्ही सगळे मोकळे.” भाऊ म्हणाले.

"श्रीधरने मान वर केली. आणि जड आवाजात म्हणाला, "मी फार मोठी चूक केली भाऊ. तिला ओळखलंच नाही. पण आता तिला परत तरी कसा आणू? किती दुखवून ठेवलं आहे मी तिला. ती कशी विसरेल माझं ते वागणं. पण मला आता फार वाटतंय की ती या घरात मला हवी आहे. रेणूला हवी आहे, जीवनला हवी आहे. जिनीला हवी आहे. पण ती कसं मानेल हे..." पश्चात्तापाने श्रीधर म्हणाला.

"तुला ती हवी आहे, हे तिला अशक्य वाटणार. तुला तिचा विश्वास मिळवावा लागेल. तुझे ऑफीसमधले पाश तोडावे लागतील."

"मी सगळं करायला तयार आहे पण तिला ते पटलं पाहिजे."

"असं आहे तर जा, तिला घेऊन ये." श्रीधर थक्क होऊन भाऊंकडे पाहायला लागला. भाऊ असं म्हणतील याची त्याला कल्पनाच नव्हती.

"पण ती कुठे आहे काय माहीत?"

"मी तिचा बाप आहे ना? उद्या दुपारी एस.टीने ती गावी परत जाणार आहे. तिने तिकीट काढून ठेवलेलं माहीत आहे मला, पण ते तिलाच माहीत नाही. राघव सकाळी तिचं सामान घेऊन जाणार हाही बेत मला कळलेला आहे. आत्ता ती त्याच हॉटेलात राहिली आहे. जा, तिला जाऊन घेऊन ये."

"आणि ती नाही म्हणाली तर?"

“मग तुझी हुशारी कुठे दिसणार? तू रडतच बस. ती नाही आली तर उचलून पळवून आणशील?

“जातो, आणि कसंही करून घेऊन येतो तिला.” श्रीधर ताडदिशी उठला.

“आम्हीही येतो दादा,” ताडकन उठत जीवन म्हणाला. चला तिघं जाऊ. “थांब, जिनीलाही घेऊन जाऊ.” रेणू तेवढ्यात म्हणाली. मग श्रीधर उठला. भाऊंना घट्ट मिठी मारत म्हणाला, तुमच्या सुनेला हा तुमचा मूर्ख मुलगा घरी घेऊन येईल. तोपर्यंत जागे राहा.”

सगळी हॉटेलवर पोचली. रिसेप्शन काऊंटरवरून रेणूने मधुराच्या खोलीत फोन लावला. मी तुला भेटायला येते आहे असं तिला सांगितलं. एकटा श्रीधरच वर गेला.

रेणू का आली असेल या विचारात, म्हणून मधुराने दार ऊघडलं. दारात श्रीधर उभा होता. रूमच्या दारात उभं राहून तो मधुराकडे पाहात राहिला. मधुराच्या डोळ्यांवर, कानांवर विश्वास बसत नव्हता. ती पुतळ्यासारखी थिजलेली उभी राहिली

“थांब ना मधुरा! जाऊ नकोस! प्लीज, तुझ्याशिवाय ते घर कागदासारखं पोकळ आहे. माझे सगळे गुन्हे माफ कर आणि घरी चल असं विनवायला आलोय मी. मीच काय, पण मुलंही आली आहेत तुला मनवायला.” तो शरणागत होऊन म्हणाला आणि मधुराच्या चेहऱ्यावरचा भाव पाहात राहिला.

मधुराच्या डोळ्यातून धारा वाहायला लागल्या. भाऊ, रेणू, जीवन, जिनी यांचं हे घर सोडतांना तिलाही वेदना झाल्याच होत्या. ती तशीच रडत राहिली.

आणि कधी श्रीधरच्या बाहुपाशात विरघळली ते तिलाच कळलं नाही.

उंडारलेलं खोंड तिच्या पदराच्या दावणीला आलं होतं खरं…

-----------------------------------

# सीता स्वयंवर.

गंगा यमुना, मेरू मंदार, राम कृष्ण, व्यास वाल्मिकी, रामायण महाभारत, अशा अनेक जोड्या भारतीय मनांमधे शतकानुशतके रुतून बसल्या आहेत, नारदमुनींपासून अनेक कीर्तनकारांनी, हरदासबुवांनी, कथेकरीबुवांनी, प्रवचनकारांनी, पिढ्यानपिढ्या यांना प्रवाही ठेवून आपल्यापर्यंत आणून ठेवल्या आहेत. आताच्या वैज्ञानिक युगात रामानंद आणि बलवंतराय या दोन कथेकरीबुवांनी आधुनिक जगात, आताच्या पिढीसाठी, याच कथा घरोघर पोचवल्या. महाभारतात संजयाने धृतराष्ट्रासाठी जे केलं तेच या दोन हरदासबुवांनी आताच्या जनतेसाठी केलं. संजयाने आंधळ्या कुरूपुत्राला सचित्र काहीही दाखवलंच नाही कारण त्याचा काही फायदा नव्हता. त्यामुळे त्यावेळच्या वाहिनीचं नाव महाभारतात आलेलं नाही. पण बलवंतरायबुवांनी सगळं महाभारत चलतचित्रांमधून घरोघर पोचवलं. सीताहरण आणि द्रौपदी वस्त्रहरण मुद्दाम रविवारच्या सुटीच्या दिवशी प्रसारित केलं होतं. ते दोन प्रसंग ज्या दिवशी दाखवले गेले, त्यादिवशी म्हणे रस्त्यावर पूर्ण शुकशुकाट होता. द्रौपदी वस्त्रहरणाच्या दिवशी, तान्ही बाळं सोडून बाकी सर्व लोकांनी त्यादिवशी आपापल्या घरातच सकाळ टी. व्ही समोरच घालवायची असं ठरवलं होतं. त्यामुळेच, साखळीचोर, दरोडेखोरांनाही त्यादिवशी सुटी घ्यावी लागली. घराघरातील मातांनी सकाळीच लगबगीने कामं उरकून घेतली. वस्त्रहरण झालं रे झालं की सर्वांना भूका लागणार हे माहीत असल्यामुळे आधीच नाश्त्यासाठी

उपमा करून ठेवला होता. पुरूषांनीही नंतर उशीर नको म्हणून आंघोळीला जायचे कपडे बाथरूमजवळ नेऊन ठेवले होते. पण द्रौपदीचं वस्त्रहरण चालू असतांना काही हुशार बिझनेस माईंडेड चोरांनी, दाराला पाठमोऱ्या बसलेल्या लोकांच्या घरात तोंडमोरं घुसून व्यवस्थितपणे उपमा खाल्ला, आणि गुंडाळलेले कपडे घेऊन सावकाश जिना उतरून निघून गेले होते. ते त्यादिवशीचा एपिसोड संपल्यावरच घरातल्यांना कळलं. चोरांच्या या धैर्याला उपमा नव्हती.

रामायणाच्या काळात नारदमुनींची आणि इतरांच्या अशा वाहिन्या होत्या. त्यांची नावं नुकत्याच झालेल्या अयोध्येच्या उत्खननात काही पोथ्या आणि सुटे कागद सापडले, त्यातून उजेडात आली आहेत. त्यात सीता स्वयंवराचं आणि विवाहाचं बरंच वर्णन हाती लागलं आहे. आतासारखंच त्यावेळीसुध्दा सीता स्वयंवर दाखवलं गेलं होतं. त्याची फाटकी, तुटकी, काही सुव्यवस्थित पानांमुळे माहिती नीट कळली. भाषा तज्ज्ञांनी ती जुनी भाषा व्यवस्थित लिहून काढल्यावर ती खालीलप्रमाणे वाचायला मिळाली.

सीता स्वयंवर दाखवणाऱ्या वाहिनीचे नाव एन. डी. टी. व्ही. होतं. हे नारदाने स्वत:चं नाव दिलेलं असल्यामुळे त्याचं पूर्ण नाव - नारद (एन) दशदिशा – (डी) त्रिलोक (टी.) वार्तापत्र ( व्ही.) असं होतं. नारायण नारायण अशा नामोच्चारांनी वाहिनी सुरू होत होती. नारद त्रिलोक्यातील बातम्या आणून आणि मसाला मिसळून देवलोकात पोचवत असत असं त्यात लिहिलं होतं. त्या वाहिनीला स्वयंवराच्या प्रसंगाचा आर्थिक पुरवठा, मिथिलेच्या जनकराजाकडून झाला होता. जनकाने सीतेचं स्वयंवर मांडलंय हे

कळल्याबरोबर, त्याचे प्रक्षेपणाचे हक्क मिळवायला, नारदांनी थेट मिथिला गाठली. त्यांचे जनकाशी सलोख्याचे संबंध होते. जनकराजाने ते काँट्रॅक्ट कबूलही केलं पण स्वयंवराच्या वेळी स्वयंवर मंडपात त्यांनी नारदांच्या टीमला चित्रीकरणाला प्रवेश नाकारला. खट्टू झालेल्या नारदांनी, तरीही मंडपात उपस्थित राहायचं स्वत:चं एकट्याचं आमंत्रण मिळवलं. जनकानेही नाईलाजाने कबूल केलं कारण नारदांना दुखवून चालणार नव्हतं. स्वयंवराला मोठे मोठे देशोदेशीचे सत्ताधीश येणार, एकमेकांना भेटणार, कुणी कुणाला मिठ्या मारणार, कुणी तोंड फिरवणार, हे सगळं दुसरे दिवशी त्याचा राजकीय अर्थ काढत, शक्यता आधारावर ते देशभर फैलावणार हेच जनकाला टाळायचं होतं. पण इलाज नव्हता. जनकाने मग सर्व समारंभ आणि शिवधनुष्य स्पर्धा उचलणे या कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी आपल्या बहिणीच्या मुलावर सोपवली. तेव्हा राणीमहालात बरीच धुसफूस झाली. शेवटी, राणीला शांत करण्यासाठी जनकराजाने सर्वांच्या भोजनाची व्यवस्था तिच्या बहिणीच्या मुलाकडे सोपवली. नाहीतरी तो काही दिलं तरी खाणार तर मग खरं तरी खाऊ दे एवढाच विचार त्यामागे होता. शिवाय तो कामात व्यग्र राहिला की चुगल्या आणि भांडणं कमी झाली असती.

स्वयंवराची तारीख निश्चित झाल्यावर, नारद मग स्वगृही इंद्र नगरीला परतले. पण स्वर्ग ते मिथिलामधली, सारखी येजा नको म्हणून यमुनाकाठच्या इंद्रप्रस्थ भागात आपलं ऑफीस उघडलं. आपल्या ऑफीसमधील हरहुन्नरी राजमतकडे सीता स्वयंवराच्या चित्रीकरणाची जबाबदारी सोपवली. उत्साही

राजमत लगेच तयारीला लागला. त्याने तडक मिथिला गाठली. जिथे जनकाचा राजप्रासाद होता, त्याजवळची मोक्याची जागा शोधून आला. कॅमेरा कुठे लावला म्हणजे येणारे सर्व अतिथी झूमने कॅमेरात टिपता येतील त्याचा विचार केला. कारण कॅमेराचं टेंशन नसलं की राजकारण्यांच्या वागण्यात चेहऱ्यावरचे भाव दाखवण्यात एक ढिलाई असते ती त्याला टिपायची होती. शिवाय येणाऱ्या पाहुण्यांच्या मुलाखती घ्यायला त्याने आपले विश्वासू ठरवलेच होते. मिथिलेत एक चक्कर मारून गावही बघून घेतला होता. काहींना मिथिला, आजूबाजूचा प्रदेश यांचं शूटींग करून ठेवायला सांगितलं.

सीता स्वयंवराच्या नियोजित तारखेच्या चार दिवस आधी त्याने मिथिला गाठली. त्याच्या कंपूने लगेच कॅमेरे सुरूही केले. गावातील लोकांना वाटणारं त्यांच्या चेहऱ्यावरचं विलक्षण कुतुहूल त्याने गेल्या गेल्या टिपलं. या परक्या लोकांना पाहून, काही बायकांनी घुंघट आणखीन ओढले तर काही तरूणींनी मुद्दाम मागे सारले. राजमतची टीम कॅमेरा खांद्यावर घेऊन राजधानीत हिंडायला लागली. भव्य प्रासाद, उद्यानं, रथमार्ग, गोपुरं, मंदिरं, पहिले दोन दिवस त्याने मिथिला नगरी, जनकाचा पॅलेस, नदीचा घाट, जिथे सीता सापडली ते शेत, परीटांची वस्ती, शिवधनुष्य ठेवलेली जागा, आमंत्रतांच्या रथांसाठी तयार केलेला रथतळ, त्यांच्या बरोबर येणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी घोडे आणि बैलगाड्यांचे तळ, तिथे ठेवलेले सुरक्षा अधिकारी, सीतेचा प्रासाद, मग आमंत्रितांच्या खानपानाची चंगळ व्हावी म्हणून निर्माण केलेले पानपट्टीचे ठेले, जलेबीची दुकानं, दुधांचे रांजण, ज्यांना धारोष्ण दूध हवं असेल त्यांच्यासाठी

जवळच उभारलेले दुभत्या देशी गायींचे गोठे, गायींच्या चाऱ्याचा घोटाळा होऊ नये म्हणून केलेली कडब्यांची सोय, हे सर्व फिरून, परत परत म्हणजे फिरून फिरून दाखवलं. एन.डी. टी.व्ही. हे सगळं प्रक्षेपण करणारं आहे याची जाहिरात अगदी घरोघर पोचली होती. त्यामुळे वेळ मिळेल तसं लोक हे प्रक्षेपण घरात पाहात होते.

मग राजमतने रस्त्यावरून चालणाऱ्या लोकांना ते कधीपासून मिथिलेत राहतात, सीतेबद्दल त्यांना काय वाटतं, शिवधनुष्य तुम्ही पाहिलं आहेत काय, स्वयंवरामधे कोण जिंकेल असं वाटतं, असले प्रश्न विचारून स्वयंवराचा पोल जाहीर केला. बऱ्याच लोकांना स्वयंवराशी काही देणंघेणं नसावं. काहींनी नुसताच कॅमेराकडे पाहात हात हलवला, काहीकाहींना आपल्या व्यवसायाची भीती असल्यामुळे जनकाचीच त्यांनी खूप तारीफ केली. काहींनी या स्वयंवरामुळे बेसुमार गर्दी वाढल्यामुळे रस्त्यावरून चालणं अशक्य झाल्याची तक्रार केली. काहींनी महागाई वाढल्याचं सांगितलं. काही लोकांनी या स्वयंवरामुळे अचानक रस्ते अगदी गुळगुळीत झाल्याचं, शेणमाती, कचरा, काढून टाकून स्वच्छ झाल्याचं समाधान बोलून दाखवलं. काहींनी सीता या शिवधनुष्याबरोबर लहानपणी घोडा घोडा खेळत होती, ते काय कुणीही उचलेल असं सांगितलं पण नारदांच्या सूचनेवरून तो सीन कापला गेला. राजमतला एका घराच्या दारात एक युवक नुसता उभा राहिलेला दिसला. रात्रीच्या बातम्यांमधे मिथिलेत तरूण बेरोजगार अशी बातमी वाचली गेली.

मग राजमत सीतेच्या राजवाड्याजवळ घुटमळायला लागला. राजवाड्यातून कुणीही बाहेर पडलं की त्यांना गाठायला लागला. काहींनी घाबरून पळ काढला तर काहींनी आपली राजघराण्याशी आपली कशी जवळीक आहे ते अभिमानाने सांगितलं. दास दासी, सख्या, नोकर यांच्याकडून सीतेला खायला काय आवडतं, कोणते कपडे आवडतात, तिचा स्वयंवराच्या वेळी पोशाख काय असेल याची माहिती घ्यायला आणि प्रसारित करायला सुरूवात केली. नारदांच्या वशिल्याने, इंद्रप्रस्थची कुणी रितु नावाची महिला सीतेचा पोशाख शिवणार आणि त्याची सुवर्णमुद्रांमधली किंमत राजमतला कळली. तिच्या काही सख्यांनी त्यांच्या लपाछपीच्या आठवणी जागवल्या आणि धरणीमाता, आपल्या मुलीला, सीतेला लपण्यासाठी भूमीत कसा अचानक खड्डा करायची आणि त्यामुळे सीता कशी बराच वेळ सापडायची नाही, तेही आठवून सांगितलं. तेवढ्यात राजमतला कपड्याचं गाठोडं घेऊन नदीच्या दिशेने जाणारी एक बाई राजवाड्यातून बाहेर पडतांना दिसली. आठवणीत रमलेल्या त्या सखीला सोडून, राजमत तिच्याकडे धावला. त्या परिटिणीने लपालपीच्या खेळानंतर, सीतेच्या कपड्यांवरील माती काढता काढता किती त्रास होत असे ते सांगितलं, पण तिला बिचारीला काय माहीत होतं की भविष्यात तिच्याच बिरादरीचा माणूस सीतेच्या त्रासाला कारण ठरणार आहे.

स्वयंवर आता दोन दिवसांवर येऊन ठेपलं. आता उद्यापासून शाही पाहुणे यायला लागणार, त्यांचे वकील येणार, त्यांचे सुरक्षा अधिकारी येणार,

त्याआधीच विविध देशातील, राज्यातील वाहिन्यांचे लोक यायला लागले. राजमत येणाऱ्या वाहिनीवाल्यांवर नजर ठेवायला लागला तेव्हा, एक गाडीभरून खूप मिशाळ, दांडगे दिसणारे, पांढरे कपडे, उपरणं घेतलेले, लोक राजमतला येतांना दिसले. गाडीतून उतरल्याबरोबर ते मोठमोठ्याने बोलायला लागले, हसायला लागले, जीभ चटईसारखी गुंडाळून एकदम सोडल्यासारखी त्यांची भाषा होती. काही कळत नव्हतं ते कोणत्या भागातून आले ते! त्यांचे चेहरे भारतीय नव्हते. राजमतने चौकशी केली तेव्हा ते एल. (लंका) टी. टी. (त्याच त्याच) बी (बातम्या) चे लोक आहेत असं कळलं. त्यांचीच दुसरी वाहिनी सीएनबीसी, सी- सिलोन, एन. – नावाची, बी. – बातम्यांची, सी. चक्की, अशी वाहिनी सतत चालू झाली. त्यावरचा, एक खूप बडबड करणारा कुणी अमिन नावाचा दुभाषा तरूण, त्यांच्या दूरदर्शनवर दिसणाऱ्या दृष्यांची माहिती देत होता. राजमत त्यांची माहिती गोळा करायला ती दृष्य पाहात तिथे थांबला. या लोकांनी त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या शामियानाचा लगेच ताबा घेतला.

त्या देशाचा राजा दशानन नावचा कुणीतरी होता. तो राजा जनकाचा मित्रही होता. त्याला दहा तोंडे होती म्हणे. त्यांच्या शामियानातील दूरदर्शन त्यांनी सतत चालूच ठेवलं होतं. त्यावर त्यांच्या दशानन राजाचा प्रचंड राजप्रासाद, त्याचा रूंद, दहा तोंडासकट तो जाऊ शकेल असा दरवाजा, त्याच्या बाथरूममधे दहा आरसे, सोन्याचे नळ असलेले दहा सोन्याची बेसिन, दहा कंगवे, दाखवले जात होते. एका मोठ्या सुवर्ण मंचकावर, दहा उशा ठेवलेलं

शयन गृह दाखवत होते. या लंकेत प्रचंड प्रमाणात सोनं होतं म्हणे. दशाननाच्या राजवाड्याच्या विटासुध्दा सोन्याच्या होत्या. तिथे सोन्याच्या तस्कऱ्यांना काहीच वाव नव्हता. तिथलं सोनं बाहेर नेता येत नव्हतं. त्यामुळे त्यांची पंचाईत झाली होती. त्यांचा सोन्याच्या विटा बनवायचा कारखानाही बघण्यासारखा होता. राज्यात सर्व श्रीमंत असल्यामुळे, आणि गरीब कुणिच नसल्यामुळे, समुद्रापलिकडच्या शेजारच्या देशातील लोकांना या कारखान्यात दशाननाने कामाला ठेवलं होतं. ते रोज खाडी ओलांडून लंकेत येत आणि संध्याकाळी परत जात. परत जातांना रोज थोडी भुकटी त्याच्या कपड्यांना, चपलांना, जेवणाच्या डब्यांना, चिकटून त्यांच्या घरी जात होती. ती झाडून त्या भाविक मजूरांनी आपल्या देवळांवर सोन्याची छपरं घातली होती असं तो सांगत होता. मग देशभरच्या लोकांना अमिन दशाननाच्या भोजनगृहात घेऊन गेला. तिथे एका लांब रूंद टेबलावर, दहा सोन्याच्या थाळया ठेवल्या होत्या. टेबलावर एका मोठ्या सुवर्ण घंघाळात सांबार आणि एका सुवर्ण थाळीत शिगेने रचलेल्या इडल्या होत्या. डायनिंगहॉलच्या बाहेर एक चकमकणाऱ्या कांतीचं हरीण कोवळं लुसलुशीत गवत खात होतं. अमिनने सांगितलं की ते हरीण नसून दशाननाचा म्हातारा मामा आहे. मुदपाकखान्यातील जेवणाचा कंटाळा आला की तो सकाळी थोडं गवत खात असतो. तो देहांतरात प्रविण आहे म्हणे. मग अमिनने दशाननाच्या राणीचा महाल दाखवला. ही मंदोदरी राणी तर कमालीची सोज्वळ, साध्वी वाटली राजमतला. ना तिच्या अंगावर शेरभर दागिने होते, ना जरीची साडी होती. ती शांतपणे राजवाड्याच्या सौधात बसलेली राजमतने पाहिली. ते अतिश्रीमंत वैभव पाहून राजमत दमला आणि शेजारच्या बया

वाहिनीच्या शामियानात डोकावला. ती वाहिनी फक्त खूप भरजरी साड्या, खूप चपला आणि एका साध्या साडीतल्या बाईचं चित्र सतत दाखवत होती. राजमत तिथून लगेच बाहेर पडला.

स्वयंवराचा दिवस उजाडला. जनकराजाच्या महालात गडबड, लगबग उडाली होती. नोकर चाकरांची धांदल उडालेली कळत होती. राजमत लगेच पाहुण्यांच्या आगमनासाठी बांधलेल्या लाल गालिचा अंथरलेल्या मंचाजवळ जाऊन मोक्याच्या जागी उभा राहिला. बाकीचे वाहिनीवालेही रेटारेटी करत तिथे गोळा झाले. १२ वाजता स्वयंवराला सुरूवात होणार होती. पण राजमत भल्या पहाटे ५ वाजताच तिथे हजर झाला होता. बरोबर ८ वाजता पहिला पाहुणा रथातून उतरला. राजमतने धावत जाऊन त्याला गाठलं.

तो स्वयंवर उमेदवार नव्हता. तो तऱ्हतऱ्हेच्या युध्दशस्त्रांचा, शस्त्रास्त्र विक्रेता होता. **अरिकाल ०७, AK 07 या** जगविख्यात अस्त्राचा तो निर्माता होता. देशोदेशीचे राजा महाराजा मिथिलेत येणार, इथे बिझनेस चांगला होईल म्हणून जरा लवकरच पोचला होता. राजमतने त्याला सोडलं कारण पाठोपाठ दुसरा रथ आत शिरत होता. पण तिथेही राजमतची निराशाच झाली. कारण तो उमेदवार नसून, स्वयंवराचा मंडप पास घेऊन आला होता.

“अहो, घरात तीन राण्या आहेत. आता चौथी कुठे ठेवू? त्यांच्याच भांडणाने कंटाळून सुटका करून घ्यायला मी आपला संमेलन बघायला आलोय. शिवाय स्वयंवराची रजिस्ट्रेशन फी खूपच जास्त आहे. इथे खाणं-पिणं-निवासाची फुकट सोय आहे असं ऐकलं म्हणून म्हटलं बघावं स्वयंवर.”

आता रथांची गर्दी वाढायला लागली. एकापाठोपाठ एक मान्यवर यायला लागले. काही रथ रिकामे आले तेव्हा राजमतने बातमी काढली की ते मधेच एका राण्याकडे प्रीती न्याहरीला उतरले आहेत. त्या क्षणी, राजमतचे डोळे चमकले. काहीतरी मसाला मिळणार हे नक्की होतं. राजकारण्यांना उगाचच भूका लागत नाहीत हे त्याला पक्कं माहीत होतं. स्वयंवर संपलं की या न्याहारी बेताचा माग काढायचा एवढं त्याने ठरवलं. एवढ्यात साक्षात नारदमुनी परिस्थितीचा आढावा घ्यायला राजमतजवळ आले.

राजमत कधीपासून त्यांच्या मार्गदर्शनासाठी उत्सुक होता.

“सर, मी प्रथमच एवढ्या मोठ्या समारंभाचं आयोजन करतो आहे. मला या देशातील राजकारणाची, यादवीची काहीच माहिती नाही. मुलाखती तरी कशा घेऊ? आता ते लंकेचे राजे पोचत आहेत असं कळलं, त्यांना दशानन म्हणू की रावण हाही प्रश्न विचारायचा होता.”

“एक लक्षात ठेव. फार अभ्यासपूर्ण लिहायला तू काही डळमळकर नाहीस. लोकांना फार शहाणं करूही नकोस. फार फाजील होतात ते! त्याचा मग आपल्यालाच त्रास होतो. एकच लक्षात ठेव की तुझं काही चुकलं तरी कुणाला ते कळू देऊ नकोस. अशावेळी मोठा आवाज काढायचा आणि विषयच बदलायचा. आणि दुसरं, पाहुणा कितीही नादान असला तरी सन्मानानेच वागवायचं. दशाननच म्हणायचं नाहीतर रात्री तो तुझी तंगडी तंदूरमधे घालेल.” नारदमुनी आणखी काही बोलणार इतक्यात एक विमान घरघरत खाली आलं आणि त्यातून साक्षात दशानन महाराज खाली उतरले. पाठीमागून त्यांचे

त्यांच्यापेक्षाही भयप्रद असे सुरक्षा अधिकारी उतरले. त्यांच्या विमानाचं नाव पुष्पक आहे असं राजमतला कळलं. हे वाहन तो प्रथमच पाहात होता. लंकाधिपतींनी ते त्याच्या नलकुबेर भावाकडून हिसकावून घेतलं होतं, असं शेजारी उभं असलेलं, बया वाहिनीचं कुणीतरी कुजबुजलं.

नारद स्वत: त्यांच्या स्वागतासाठी पुढे झाले. राजमतही त्यांच्यामागे लपत तिथे पोचला. “स्वागत असो महाराजाधिराज लंकाधिपती.” नारदांच्या या स्वागतावर दशानन किंचित गडगडाटी हसले आणि त्यांनी नारदमुनींच्या पाठीवर थोपटलं. त्याबरोबर पडतापडता उभे राहिलेले, नारदमुनी लगेच दूर झाले आणि त्यांनी दशानन महाराजांना स्पर्धा जिंकण्याची, यशाची किती खात्री आहे असं विचारल्यावर लगेच दशाननाने आपला उजवा हात कोपरात वाकवला तेव्हा त्यांचा ५ शेराचा सोन्याचा बाजूबंद कचकन् तुटला. त्यांना नक्की खात्री होती एवढाच बोध दोघांनी घेतला. एकेक करत, आमंत्रित मान्यवर सगळे आले होते. आपली गळ्यात अडकवलेली तंबोरी वाजवत नारदमी, आणि दशानन महाराजही मंडपात पोचले. आता राजमतला काहीच काम उरलं नाही. मंडपात प्रवेश नसल्यामुळे त्याला कॅमेरे बाहेरच ठेवावे लागणार होते. एवढ्यात राजमतची नजर विश्वामित्र आणि त्यांच्याबरोबर येणाऱ्या दोन युवकांवर पडली. ते चालतच येत होते.

“विश्वामित्र सीता स्वयंवराला? हे पण पण जिंकायला आले की काय? या वयात त्यांना सीता हवी?” राजमतला प्रश्न पडला. पण लीन चेहऱ्याने, तो

परमभक्तीने त्यांच्याजवळ पोचला. “वंदन ऋषिवर, तुम्हीपण पण जिंकायला आलात?”

“नाही, या दोन तरूणांना स्पर्धेत उतरवणार आहे मी. माझे हे शिष्य आहेत. अयोध्येच्या इक्ष्वाकु कुलातील दशरथाच्या रॉयल ब्लडचे आहेत.” दोन थपडा राजमतला लगावाव्यात या विचारात, विश्वामित्र कोरड्या आवाजात म्हणाले आणि लगबगीने मंडपात जागा पकडायला धावले. ही बातमी राजमतला नवीन होती आणि फक्त त्याच्याच चॅनेलला मिळाली होती. त्या सुकुमार राजपुत्रांना पाहून राजमतला त्यांचा न जिंकण्याचा निकाल लगेच कळला होता.

राजमत आता पूर्ण मोकळा झाला. त्याने मंडपाजवळ जाऊन कनातीला कुठे एखादं भोक पडलंय का ते फेरी मारून पाहिलं आणि त्याच्या सुदैवाने एक मोठं भोक त्याला सापडलं. त्याने त्यात आपला डोळा घातला. तेव्हा त्याला मंडपातली संपूर्ण सजावट पाहता आली. ती दक्षिणेतल्या कुणा नितुकुमाराने केली आहे असं त्याने ऐकलं होतं. मोठ्या इव्हेंटस् ची सजावट त्याच्याचकडे येते हेही त्याने ऐकलं होतं. खरंच वैभवपूर्ण सुंदर, भव्य होता मंडप. आत जाहिरातीचे मोठेमोठे फलक जागोजाग चमकत होते. त्यात पवन रथ आणि गंगाजल बॉटलिंगचे फलक खूप मोठे होते. वल्कल सिल्क साडी नेसलेली, शाल्मली नावाची एक तरूणी कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करत होती. पहिल्या रांगेत देशोदेशीचे पाहुणे, राजे महाराजे बसले होते. त्यांच्यामागे स्पर्धकांची रांग होती. डावीकडील भाग हा जनाना भग होता. तिथे सर्व राणीवसा, जनकाच्या

म्हाताऱ्या नातेवाईक स्त्रिया, दरबारातील मंत्र्यांच्या बायका घुंघट ओढून बसलेल्या दिसल्या. त्यांच्या कपाळावरील लाल सिंदूर फक्त दिसत होता. सीता, उर्मिला, श्रुतकीर्ती, मांडवी वगैरे राजकन्या राजमतला पाहाता आल्या नाहीत. त्या आत असाव्यात. एका झगमगीत, सोनेरी गालिचा अंथरलेल्या उंच मंचावर प्रचंड मोठं शिवधनुष्य ठेवलेलं होतं. प्रत्येक स्पर्धकाने तिथे यायचं आणि ते उचलायचं असा पण होता. उमेदवार त्या वजनाने खाली पडला तर त्याला जखमा होऊ नयेत म्हणून जाड गाद्या घातलेल्या होत्या.

आता स्पर्धेला सुरुवात झाली. सूत्रसंचालन करणारी युवती उमेदवाराचं नाव, वय, देश, सगळं सांगायला लागली. मग उमेदवार पुढे यायचा. पण नंबर पुढे सरकायला वेळ लागत नव्हता कारण एकतर उमेदवाराचं नाहीसं होणं, धप्प असा आवाज, पाठोपाठ स्ट्रेचर एवढंच व्हायचं किंवा शिवधनुष्याकडे पाहात त्याच्याजवळ गेलेला उमेदवार लगेच उलटा फिरून आपल्या आसनावर येऊन बसत होता. तेच तेच पाहून, कंटाळलेल्या, एकाच डोळ्याने पाहात बसलेल्या राजमतचा डोळा दुखायला लागला म्हणून तो नजर काढणार इतक्यात त्याला मंडपात काहीतरी गडबड दिसली. पुचाट उमेदवारांच्या कामगिरीला कंटाळलेला राजा दशानन अचानक शिवधनुष्याकडे चालायला लागला. तेव्हा त्या सूत्रसंचालन करणाऱ्या मुलींने “आप कतारमे हो।” असं त्याला सांगितलेलं ध्वनिक्षेपकामुळे राजमतने ऐकलं. पाठोपाठ दशाननाचं गडगडाटी हास्यही ऐकू आलं तेव्हा ती भेदरलेली मुलगी बाजूला झाली. धिप्पाड, रूंद खांद्यांचे, दीर्घबाहू, दणदण पावलं टाकत शिवधनुष्याजवळ जाऊन पोचले होते. त्यांनी

सुहास्य (?) मुद्रेने सर्व सभेवर एक नजर टाकली, शिवाचं मनोमन स्मरण केलं आणि धनुष्याला हात घातला. "मी कतारमधे नाही, मिथिलेत आहे" असं ठणकावून सांगितल्यावर दशानन शिवधनुष्याकडे गेला. त्याच्या पाठीराख्यांनी लगेच महाराजांचा विजय असो अशा आधीच आरोळ्या ठोकल्या. इतक्यात धनुष्याचा धप्प असा आवाज समस्त उपस्थितांनी ऐकला आणि रागारागाने दशाननाने मंडप सोडल्याचं राजमतला दिसलं. हा केवळ चमत्कार होता. खुद्द सीतेपासून भालदार-चोपदारापर्यंत सर्वांना त्यांच्या विजयाची भीती होती. पण वेगळंच घडलं होतं. आत्ता कॅमेरा हवा होता. केवढी सुसंधी हातून निसटली. आता ग्रॅफिकच्या सहाय्याने रात्री हा प्रसंग प्रसारित करायला हवा याची राजमतला हळहळ वाटली. राजमत ताबडतोब प्रवेशद्वारापाशी धावला. बाहेर कॅमेरा वापरायची परवानगी होती ती संधी तो कशाला दवडेल? त्याने रावणाचा पाठलाग केला. लांब लांब टांगा टाकत दशानन महाराज त्यांच्या पुष्पक विमानाजवळ गेले तेव्हा गावातील शेंबडी मुलं विमानावर चढून घसरगुंडीचा खेळ खेळत होती. रावणाला येतांना पाहून ती तिथल्या तिथे नाहीशी झाली.

राजमतने दशाननाला विमानाजवळ जातांना आणि ते पण, "पण" हरल्याचं आपल्या चॅनेलला ताबडतोब कळवलं. त्याक्षणी घरोघर बसलेल्या भारतीय जनतेला तगडा स्पर्धक हरल्याची बातमी मिळाली आणि समस्त देशवासियांनी सुस्कारा टाकला. रस्त्यावर लावलेल्या मोठ्या स्क्रीनवर ही स्पर्धा बघणारेही आनंदाने नाचले. ही बातमी लंकेपर्यंत पोचली. क्षणात सारे लंका दूरदर्शनवाले गायब झालेले होते. राजमतच्या निवेदकाने लगेच, दशानन युध्द

छेडण्याची शक्यता असल्याची घोषणा करून टाकली. निवडणुकीत उमेदवार पडतो, म्हणजे हरतो, हे दाखवण्याची सवय असलेल्या निवेदकाने लगेच ग्राफिकच्या माध्यमातून रावणाचं जमिनीवर पडणं आणि शिवधनुष्य त्याच्या छातीवर पडलेलं दाखवलं आणि देशभर खळबळ माजली. रावणाचं विमान घरघरत निघून गेलं.

रावण गेल्यावर, राजमतने धावत येऊन भोक गाठलं आणि त्याने जे पाहिलं त्यावर त्याच्या एका डोळ्याचा विश्वासच बसेना. खरं तर सगळे उमेदवार संपले होते पण विश्वामित्रांच्या सूचनेवरून शेवटचा स्पर्धक म्हणून त्यांच्या शिष्याला जनकाने स्पर्धेत भाग घ्यायची परवानगी दिली. खरं त्याच्या नावाचं ना रजिस्ट्रेशन होतं न फी जमा झाली होती पण विश्वामित्रांच्या रागाला आणि शापाला घाबरून जनकाने परवानगी देऊन टाकली होती. मग विश्वामित्रांबरोबर आलेल्या त्या मळकट कपड्यातील तरूणाने आपल्या गुरुला अत्यंत नम्रपणे वंदन केलं आणि तो धनुष्याजवळ जाऊन उभा राहिला. दीर्घ श्वास घेऊन, शिवधनुष्य लीलया एका हाताने उचलत त्या तरूणाने प्रत्यंचा ओढली आणि आपण बाणही जोडू शकतो हे दाखवून दिलं. आणि मग वळून सर्वांकडे विजयी नम्र चेहऱ्याने पाहिलं. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. या अचानक मिळालेल्या कलाटणीमुळे जनकाला मनस्वी आनंद झालेला राजमतला बारीक (भोकामुळे) नजरेला दुरूनही दिसलं. रावण जेव्हा शिवधनुष्याजवळ गेला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरचे भीतीचे भाव राजमतला टिपता आले नव्हते. राजकारणी कधीही आपल्या भावना उघड करत नाहीत हे राजमतने अनुभवलं होतं.

अचानक झालेल्या या विजयाने जनक खूष झाला. सूत्रसंचालिकेने हा तरूण अयोध्येचा प्रिन्स असल्याचं सांगून आणखी एक धक्का दिला. तिला आयत्या वेळी आलेल्या या तरूणाचा बायोडेटा आधीच्या यादीत मिळाला नव्हता. पण रामचंद्र दशरथ चंद्रवंशी विजयी झाल्याचं स्वत: जनकराजाने आनंदी मुद्रेने सर्वांसमक्ष जाहीर केलं.

आता आतल्या महालातून वरमाला घेऊन येणाऱ्या सीतेचं आगमन सर्वजण प्राण आणून पाहू लागले. पण नेहमीप्रमाणेच,तिची ब्युटिशियन अजून तिला नटवतच होती. शेवटी जावं की काय या विचारात असलेल्या कंटाळलेल्या उपस्थितांना, वरमाला घेतलेली मैथिली लाजत लाजत मंडपात येतांना दिसली.. परत एकवार टाळ्यांचा कडकडाट झाला. ती खाली मान घलून घुंगट चेहऱ्यावर ओढून रामाजवळ गेली आणि हार घालायला तिने आपले हात वर उचलले इतक्यात रामाने हात वर करून सर्वांना थांबण्याचा इशारा केला. वातावरण अचानक तंग झालं. या नवीन ट्विस्टमुळे जनकही घाबरला. मंडपात कमालीची तंग शांतता पसरली. परत सस्पेन्स, मग त्या दशरथपुत्राने आपल्या आईवडिलांच्या समक्ष हा विवाह करण्याची इच्छा बोलून दाखवल्याबरोबर सस्पेन्स संपला. आता हा विवाह वरपक्षाकडील मंडळी आल्यावर होणार हे जनकाने घोषित केलं आणि तिथल्या तिथे याच मुहूर्तावर आपण आपल्या उर्मिला, श्रुतकीर्ती, मांडवी या तीन कन्या रामाच्या इतर तीन भावांना देण्याची घोषणा करून टाकली. गेट वन आणि थ्री फ्री. आपल्या तीन मुली राजघराण्यात उजवून टाकण्याच्या या समय सूचकतेवर जनक स्वत:च स्वत:वर खूप खूष

झाला. राजकुँवर लक्ष्मण तिथे हजर होता त्यामुळे तो सर्वांनी पाहिला. पण भरत आणि शत्रुघ्न हे आणखी दोन मुलगे किंग ऑफ अयोध्या यांना आहेत हे नव्याने जनतेला कळलं. त्यातला शत्रुघ्न हा अगदी देखणा, राजबिंडा, नायकासारखा दिसतो असं कुणीतरी तिथे बोललं.

आता स्पर्धा संपल्यामुळे राजमतला मंडपात कॅमेरा न्यायची परवानगी मिळाली. त्याने तडक सीतेला गाठलं आणि या विजयाबद्दल तिची प्रतिक्रिया विचारली. तेव्हा "जेथे राघव तेथे सीता" एवढंच ती लाजेने चूर होत म्हणाली. समस्त भारतवासीयांना त्याच क्षणी भावी राजसुनेचं, सीतेचं आणि मुलींनी कसं लाजावं याचं दर्शन झालं. मग राजमतने रामाला त्याच्या "पण" जिंकण्याबद्दल विचारलं तेव्हा त्याने "आईचा आशीर्वाद" एवढंच म्हटलं. तेव्हापासून आपल्या रथावर "आई तुझा आर्शिवाद" असं लिहायची प्रथा रुढ झाली म्हणतात.

राजमतने नंतर पराभूत उमेदवारांच्या मुलाखती घ्यायला सुरूवात केली. एकजण म्हणाला की रामाचा नंबर जनकाने जाणून बुजून शेवटचा ठेवला, त्यामुळे त्याला मॅच फिक्सिंगचा संशय येतोय. कारण शिवधनुष्य एकसारखं उचलल्यामुळे तोपर्यंत खिळखिळं झालेलं होतं. दुसरा म्हणाला की विश्वामित्रांच्या उपस्थितीमुळे त्यात काहीतरी जादूटोणा झाला असण्याची शक्यता आहे. तिसरा म्हणाला की मी जिंकणार नाही हे मला माहीतच होतं पण देशभर मला लोकांनी ओळखावं आणि प्रसिध्दी मिळावी म्हणून मी भाग घेतला. चौथा म्हणाला की मला कुठेतरी टूर करायची होती, इथे जेवणखाणं याची फुकटात सोय होणार होती आणि स्पर्धेची करमणूकही होती म्हणून भाग

घेतला. पाचवा म्हणाला की जनक आणि दशरथ राजांचं आधीच काहीतरी गुप्त संगनमत झालं असणार, नाहीतर नेमके दशरथाला ४ मुलगे आणि जनकाला ४ मुली यांचं गणित कसं जुळलं. राजमतने मग त्यांचा नाद सोडला. जनक राजाने तिथल्या तिथे आपल्या इतर मुलींचा विवाह दशरथपुत्रांशी ठरवून टाकल्यामुळे देशात हे खरं असण्याच्या चर्चेला उधाण आलं.

तेवढ्यात नारदमुनी येतांना राजमतला दिसले. त्यांनी राजमतला रात्री आपल्या वाहिनीवरून या समारंभाची चर्चा ठेवायला राजमतला सुचवलं. रावण शिवभक्त असल्यामुळे, काही त्याच्या बाजूने बोलणारे, विष्णू पार्टीच्या काही श्रेष्ठींना आणि जनक राजाच्या विरोधकांना बोलवायला सांगितलं. त्यांचा अंदाज काय होता आणि रामाच्या यशाबद्दल काय वाटतं यावर चर्चा ठेवायला सांगितली. “मी रामाला हिंदु हृदय सम्राट असं संबोधू का?” असं राजमतने विचारल्यावर नारद जरा विचारात पडले. खरंतर सर्व महाराजांमधे कळ लावायला ही चांगली संधी होती. पण मग म्हणाले की “आद्य हिंदूसम्राट म्हण हवं तर. हा मुद्दा नंतर कधीतरी बाहेर काढायचं त्यांनी मनोमन ठरवूनही टाकलं.”

राजमतने मान डोलावली आणि मग तो इंद्रप्रस्थाला जाण्यासाठी व्हॅनमधे बसला. नारद मुनींनी ताबडतोब, आपली दुसरी टीम अयोध्येतील वार्तांकनासाठी तिथे पाठवली. युवराज रामाचा विजय झालेलं कळल्याबरोबर, तमाम अयोध्यावासी खूष झाले. त्यामुळे सर्व देशवासीयांनी अयोध्येतील लोक नाचतांना, ढोल, ताशा बडवतांना, गुलाल उधळतांना दिसले. फटाक्यांच्या माळा धडधडतांना, तुपात भुजलेले मोतिचुराचे लाडू वाटतांना, पाहिले.

अयोध्येतील राजवाड्यांमधेसुध्दा भलताच आनंदी आनंद होता. नारदमुनींची मंडळी सर्व माहिती आणि दृष्ये जशी मिळतील तशी लगेच प्रसारीत करत होती. प्रत्येक राणीच्या खासगी दासदासींना गाठत होती. आणि माझं नाव घेऊ नका असं सांगत त्या आतल्या म्हणजे महालात चाललेल्या बोलण्यांची बित्तंबातमी पुरवत होत्या. कौसल्याराणीच्या थोरल्या वाड्यात, आनंदी आनंद होता, तर सुमित्रेच्या मधल्या महालात सुमित्राराणी सुखावली होती. उगीच हिरोगिरी करत हिंडणाऱ्या तिच्या मुलाच्या गळयात चांगली मुलगी अडकणार होती. नाहीतरी राज्य करायची त्याला संधी नव्हतीच, पण निदान संसाराला तरी शोभा येईल एवढाच तिचा आनंद होता. एका रामाच्या शिवधनुष्याचा पण जिंकण्यामुळे सर्व मुलांची लग्नं होणार आणि चार सुना घरात येणार म्हणून दशरथ राजाही खूष होता. आता राज्याचा खजिना किती भरणार एवढाच अंदाज लावत बसायचं होतं.

कैकयी राणीच्या महालात मात्र कमालीची शांतता होती. त्याला कारणही तसंच होतं. खरं तर कैकयीसुध्दा राजकन्या घरात येणार, ती किती दागिने आणणार या आनंदात दंग असतांनाच राणीची दासी कपड्यांच्या घड्या करायचं काम घेऊन कैकयीच्या महालात आली.

"मंथरे, किती साड्या लागतील गं मला लग्नासाठी? मी त्याच विचारात आहे. कोणते दागिने घालू? किती नवीन वस्त्रं घेऊ?थोरल्या आणि मधल्या जाऊबाईंपेक्षा ते सगळं वेगळं असायला हवं." कैकयीने मंथरेला प्रश्न केला.

“हाय दैय्या, तुम्ही ना बाईसाहेब लई भोळया हाहात.! मंथरेने जाणिवपूर्व शब्द म्हटले.

“म्हणजे?” चमकून कैकयीने विचारलं.

“मंथरा राणीच्या जवळ गेली आणि बारीक आवाजात म्हणाली, “भोळया नाहीतर काय? काही कळलं आहे का तुम्हाला? लक्षात आलं आहे का?”

“काय लक्षात यायचं?”

“अवं, लबाडी बघा कशी झाली आहे ती! सीता मिळाली आपल्या रामूभैय्यांना, बरोबर? जनकराजांची औरस मुलगी उर्मिला मिळाली लक्ष्मणदादांना, बरोबर?”

“हो! मग त्यात काय वाईट आहे?” कैकयी राणीने मान डोलावली. आपल्याच सुना होणार ना त्या!”

“च्! आपल्या मालकिणीकडे दयेच्या नजरेने पाहात मंथरा म्हणाली, कसं लक्षात येत नाही आहे तुमच्या? अहो, भरतदादांना आणि शत्रू दादांना कुणाच्या कन्या तर जनकराजांचे बंधू कुशध्वज यांच्या मुली…श्रुतकीर्ती आणि मांडवी. आहे ना फाजिलपणा? कळला का जनकराजांचा चाणाक्षपणा?” आत्ता कुठे कैकयी राणीच्या डोक्यात प्रकाश पडला… आणि माझ्या मुलामुळे तुम्हाला राजकन्या सूना मिळाल्या हे वरचेवर कौसल्याबाईंनी तुम्हाला बोलून दाखवलं तर?”

“मंथरे, उगीचच थोरल्या बाईबद्दल तू काहीतरी वाईट बोलू नकोस.. किती सोज्वळ आणि प्रेमळ आहे त्या! अगदी खानदानची थोरली त्यागी बहू असते तशा आहेत त्या!”

“राहिलं! माझं काय जातंय मेलीचं!” तिचं आणि कौसल्या - सुमित्रा राण्यांच्या दासींशी वाकडं होतं. त्या आता मंथरेला कमी लेखणार हे तिला कळलं होतं, मंथरेचं कान भरण्याचं काम झालेलं होतं. कपड्यांच्या घड्याही घालून झाल्या होत्या.” मंथरा निघून गेली पण कैकयीच्या डोक्यात मात्र मत्सराचा कीडा वळवळायला लागला. ही सगळी हकीकत खात्रीलायक सूत्रांकडून एन.डी. टी. व्ही. च्या हाती लागली होती.

रामविवाहाचा मुहूर्त ठरल्यावर अयोध्येत राण्यांच्या खरेदीचा धमाका उडाला. आता खजिना रिकामा झाला तरी दशरथ राजाला काळजी नव्हती. कारण तो आता हुंड्यामुळे, चौपट भरणार होता. राजा दशरथही बायकांच्या कटकटीपासून जरा मोकळा झाला. लग्न मिथिलेत होणार पण रिसेप्शन मात्र अयोध्येत करावंच लागणार होतं. त्यासाठी परत नितुकुमार नर्मदा ओलांडून अयोध्येला आला. राजा दशरथाला व्यासपीठ कमळाचं हवं होतं तर कौसल्येला प्रासादाचा सेट उभा करावा असं वाटत होतं. दुसरा पर्याय मंदिराचा होता. रामाला स्वतंत्र घर करून द्यायचा कौसल्येचा बेत होता. तेव्हाच नितुकुमाराने घर करून दिलं असतं तर पुढच्या सर्व युगांचा प्रश्न तेव्हाच मिटला असता. पण दशरथाला राज्य करायचं होतं. कशाने त्याच्या राज्याला आणि राजकुमाराला जास्त लोकप्रियता मिळेल याचा त्याला विचार करायचा होता. म्हणून दशरथाने

मंदिराचा सेट उभारायला सांगितला. त्यामुळे भाविक लोक आपोआप रामाच्या पक्षात येतील असा दशरथाचा होरा होता. मग मंदिराचं व्यासपीठच निश्चित झालं. त्याने रिसेप्शच्या मंडपात बर्फाळलेले झरे, आणि त्यातच बर्फाची कमळं, गंगेचं पात्र, त्यावर हिरवे दिवे यांची योजना करायला नितुकुमाराला बजावलं. रिसेप्शन ३ दिवस चालणार, त्यातले एक दिवस सर्व राजकारणी, दुसरे दिवशी सर्व कलाकार – गायक मंडळी आणि तिसरे दिवशी सर्व उद्योगपती एवढं मात्र एकमुखाने ठरलं. मग आमंत्रण पत्रिका तयार करण्यासाठी देशातल्या सर्वोतम चित्रकाराला शोधून अमात्यांनी पकडून आणलं. त्याला पाहिल्यावर दशरथ राजा संतापले. त्याचे फाटके कपटे, भणंगासारखी वाढलेली दाढी, पायात चपला नाहीत, पाहून तो कुणीतरी वेडा असावा असंच त्यांना वाटलं. पण अमात्यांनी राजांची समजूत काढली आणि त्या चित्रकाराच्या हातात कुंचला दिल्याबरोबर त्याने जी जादू दाखवायला सुरूवात केली त्याने दशरथ महाराज निर्धास्त झाले आणि खूप खूष झाले. मेंदी, संगीत हेही ठरलं. भोजन व्यवस्थाही मनासारखी झाली. रामाचा पोशाख कुणी नंदन नावाच्या शिंप्याने तयार केला तेव्हापासून तो स्वत:ला रघुनंदन म्हणवून घेऊ लागला. मग आहेर घेण्यावरून चर्चा गरमागरमीची झाली. यावेळी तिन्ही राण्या एक झाल्या होत्या आणि आहेर घ्यायचाच या आग्रहाने पेटल्या होत्या. आजवर सगळ्यांकडे आहेर केले त्यांच्याकडून आपणही घ्यायला नको का हा त्यांचा विचार रास्त होता.

आता शाही खानदानाची मिथिलेला जायची तयारी सुरु झाली. सुंदर सुंदर रथ तयार होऊन रथतळावर उभे राहिले. मिथिलेला निघायच्या शुभ

मुहूर्तावर वाजत गाजत मिरवणूक निघाली. शत्रुघ्नाचे मित्र जोरजोरात नाचत होते. कैकयी खूप भडक नटली होता. कौसल्या अगदी सुंदर, सुलोचना दिसत होती. कैकयीसारखं खूप नटावं की थोरल्या राणीसारखं सोज्वळ दिसावं या वैचारिक घोळात सुमित्राराणी, काहीतरी तिसरंच थोडं थोडं नटली होती. मिरवणुकीत काही खूप नटलेल्या सुंदऱ्या काहीतरी परकीय भाषा बोलत होत्या. स्वत:ची भाषा न बोलणाऱ्या त्या नक्की नट्याच होत्या.

मिरवणूकीत काही स्थानिक सुभेदारही होते, संस्थानिकही होते. खरं तर चालण्याची त्यांना सवय नव्हती, पण राज्य प्रमुखाच्या युवराजाच्या मिरवणूकीत चालणं जरूर होतं. युवराज भविष्यात राजाही होणार होता. राजमतने त्यातील एका वीरभद्र सुभेदाराला गाठलं आणि विचारलं.

“तुमची प्रजा सुखात आहे ना?”

“कोण म्हणलं की माजी परजा दु:क्की हाय?” त्यानेच गुरगुरत प्रतिप्रश्न केला.

“नाही तसं नाही, पण कुणी अल्पसंख्य नाराज असतील, तर तुमच्याकडे त्यांच्यासाठी काय योजना असतील?” राजमतने लहान गट शब्दाच्या ऐवजी अल्पसंख्य शब्द वापरला आणि प्रतिक्रिया पाहात बसला.

“हे बगा, आमच्या राज्यात एकही घर अल्पसंक्येचं नाही. प्रत्येक घरात भरपूर मुलंबाळं हाईत. ते सर्व सुखिबी हाईत. आणि जर उगीचच सुकासुकी कुणाच्या पोटात ठुसठुसायला लागलं तर त्यांची हैगै केलि जाणार नाही.”

रात्रीच्या बातम्यांमधे नारदांनी वाक्य लिहून पाठवलं होतं ते १०/१५ वेळा सतत चॅनेलवरून दाखवलं जात होतं, “अल्पसंख्यकोंपर सरकारकी कडी नजर। उनसे नरमाईसे काम नही चलेगा”

सर्व रघुवंश मिथिलेत पोचला. राजमार्गावर सीतेचे आणि तिच्या बहिणींचे लहानपणापासूनचे फोटो सर्वत्र झळकत होते. सीता अंडरग्राऊंड जन्मली असली तरी अंडरवर्ल्डशी तिचा काहीही संबंध नाही हे मिथिलेत, परत परत सांगितलं जात होतं. राजमार्गावर नवीन नवरदेवांना पाहायला बघ्यांची खूप गर्दी झाली होती. चारही भाऊ एकेका रथांतून थाटामाटात जात होते. जनकाने सर्वांचं भव्य स्वागत केलं. आणि त्यांना शाही महालांकडे पोचतं केलं.

आपल्या चार मलींच्या लग्नासाठी जनकराजाने प्रतिष्ठित, पॉवरफुल, ऋषीमुनी आणि देवादिकांनाही आमंत्रण दिलं होतं. रामबंधूंचं तीरकमान चालवण्याचं शिक्षण डूनच्या जंगलात झालेलं होतं, तिथल्या गुरूजींनाही आमंत्रण होतं. विवाह समारंभाच्या दिवशी अयोध्या वऱ्हाडींची प्रचंड थाटामाटात मिरवणूक निघाली आणि विवाह मंडपापर्यंत आली.

आकाशातून सर्वांवर पुष्पवृष्टी होत होती. लक्ष्मीबाई – विष्णूपंत, शंकरराव – पार्वती बाई, हिमालयअण्णा – मेनाबाई, इंद्र -सची, विठोबा - रखुमाई, असे देवादिक सर्वजण सपत्नीक विवाह समारंभ पाहायला स्वर्गाच्या बाल्कनीत उपस्थित होते. पार्वतीबाईंच्या गणेशाला जनकाने विवाह समारंभ निर्विघ्न पार पाडायला जातीने उपस्थित राहायचं आमंत्रण दिलं होतं, त्यामुळे आपलं मूषक वाहन घेऊन, गजानन स्वयं मिथिलेत होते. ते एकदा असले की

सर्व दहशतवादी दूर असतील याची जनकाला खात्री होती. लग्न, संसार, स्त्री यात रुची नसलेला कार्तिकेयन हिमालयाच्या घाटीमधे कार रेसिंगच्या प्रॅक्टीससाठी निघून गेला होता. देवेंद्र इंद्राने मिरवणुकीतील तरूणींना न्याहाळायला सुरूवात केली आणि तो कुणाकडे बघतोय त्यावर सची नजर लावून बसली. बराच वेळ झाला तरी मिरवणूक नजरेच्या टप्प्यात येईना तेव्हा सहनशक्ती संपून, वैतागून लक्ष्मीबाईंचा पारा चढला. खरं तर विष्णूपंतही आपण या नव्या रामावतारात कसे दिसतो आहोत, हे पाहायला उत्सुक होते.

“कुठेही वेळेवर न जाता, ग्लानीर्भवती वेळ आणायचं हे तुमचं धोरण या अवतारातही चालूच राहाणार की काय? आता मलाच ग्लानी येणार आहे.” चिडलेल्या लक्ष्मीबाईंचं खवट वाक्य ऐकल्यावर सर्वसाधारण नवरे जसा निर्विकार चेहरा ठेवतात तोच चेहरा विष्णूपंतांनी ठेवला. इतक्यात वरात स्पष्ट दिसायला लागली. केशरी कपड्यातील नरेंद्र रामलल्ला, पांढरे बूट, पांढरे – चंदेरी रेशमी कपडे घातलेला, त्यावर हिऱ्याचं पदक असलेल्या मोत्यांच्या माळांनी नटलेला शत्रुघ्नकुमार, आपल्या थोरल्या बंधूंचं अनुकरण करणारा लक्ष्मणकुमार, आणि मिळतील ते कपडे घालून आलेला भरतकुमार सर्वांनी पाहिले. भरतकुमाराचं तसंच होतं. मोठा भाऊ काय म्हणेल ते तो लहानपणापासूनच लगेच ऐकायचा. इथे बस म्हटलं की तिथे बसायचा, हे कर म्हटलं की ते करायचा. कैकयीचंही त्याच्याकडे अजिबात लक्ष नव्हतं.

लक्ष्मीबाई सोडून सर्व देवस्त्रियांनी राण्यांची जरीची वस्त्रं, दागिने न्याहाळले. पार्वतीबाईंना त्यात काहीच रस नव्हता. विवाह समारंभ सुरू झाला.

मंगलाष्टकं झाली. सर्व राजकन्यांनी आपापल्या राजकुमारांच्या गळयात सुवर्णपुष्पांचे हार घातले. सोन्याची फुलं उधळली गेली. मुलींनी सासरी निघतांना जनक राजाच्या गळयात पडून हमसून हमसून रडत सर्वांचा निरोप घेतला. आणि सर्वजण अयोध्येला पोचले. तिथेही थाटात रिसेप्शन झालं. नारदमुनींनी हा सर्व सोहळा सर्व भारतीयांना दाखवायला, शूट केलेले सर्व विवाह प्रसंगांचे हक्क सगर पुत्राला दिले. त्या आनंदात, त्या युवकाने मग आपलं नावच रामानंद करून टाकलं. रामानंदने ही सारी चित्रफित रोज दूरदर्शनवरून प्रसारित करायला सुरूवात केली. ती फिल्म पाहात तासन् तास वाहिनीसमोर जनता बसायला लागली.

मिळालेल्या कागदांवरून एवढीच माहिती हाती आली आहे.

त्यावरूनच पुढे अनेकांना ४ हा आकडा खूप लाभदायक आहे असं अंकपंडितांनी सांगितल्यामुळे "चार दिवस राण्यांचे, चार दिवस राजकन्यांचे" ही चा.दि.रा.चा.दि.रा.ही मालिका वर्षानुवर्षे चालू ठेवली म्हणतात.

-------------------------------------------

# मला जरा कळेल का?

सकाळचे साडेपाच वाजले. गजर झाला. खोलीतली ट्यूबलाईट लागली. तिचा प्रकाश झोपलेल्या निर्मलेला न विचारताच तिच्या बंद डोळ्यांमधे भस्सकन शिरला. ती बंद डोळ्यातच वैतागली. आता हे उठणार, स्लिपर्सचा फटाफटा आवाज करत चालणार, बाथरूमचं दार जोरात उघडून जोरात नळ सोडणार, ज्या खोलीत जातील तिथले दिवे लावत जाणार, मग सैपाकघरात जाऊन मोठ्ठा नळ सोडत चहाचं भांडं भरणार, चहा साखरेच्या डब्यांचा, गाळण्याचा पसारा तिथेच ठेवून चहा पिणार हे सगळं निर्मलेच्या मेंदूत क्षणात चमकून गेलं. घरात माणसं झोपली आहेत तर आवाज न करता कामं करावीत हे त्यांच्या गावीही नसतं. उठलं तर चहा करावा लागणार, झोपून राहिलं तर पसारा आवरावा लागणार, पण झोपलेलंच बरं, निदान संवादांची तरी भर नको पडायला म्हणून निर्मलेने डोळ्यांवर आडवा हात ठेवला. सुखाची झोप संपली होती, हे तिला पक्कं माहीत होतं. आता ते आत येणार, त्यांची वस्तू कुठेय विचारणार... आपण उठून त्यांना समोर दिसणारी वस्तू त्यांना दाखवत त्यांच्या हातात ठेव... ते मनातल्या मनातलं वाक्यही पूर्ण झालं नाही, इतक्यात आवाज आलाच.

“अगं, माझा मोबाईल सापडत नाही आहे.”

“काल रात्री राजूशी बोलत होतात ना? तिथेच सोफ्यावर असेल बघा!” तिने डोळ्यांवरचा हात न काढता म्हटलं. झोप आणि झोपणं संपलंच होतं तिचं.

“नाही आहे तिथे. मी पाहिलं सगळीकडे”

निर्मलेला मग उठावंच लागलं. अनंतरावांचं शोधणं माहीत होतं तिला. ती हॉलमधे आली, काल रात्रीचं अनंतरावांचं सोफ्यावर बसून टी. व्ही पहात फोनवरचं बोलणं आठवत होतं तिला, म्हणून ती सोफ्याजवळ गेली. समोर दिसला नाही म्हणून तिने दोन उशांच्या फटीत हात घातला तिथे सापडला. तिने तो त्यांच्यासमोर टेबलावर आपटला. आईवडिलांनी बायको शोधून दिली म्हणून लग्न तरी झालं, नाहीतर बायकोसुध्दा सापडली नसती या माणसाला.. ती रागाने मनात पुटपुटली. मग परत झोपायलाच जावं म्हणून खोलीकडे वळली तर गॅसवर ठेवलेलं दूध उतू जातांना दिसलं. आता गॅस बंद करावा हे कोण सांगणार या माणसाला, पण लक्षातच येत नाही असं चरफडत ती सैपाकघरात गेली.

आता अनंतराव तयारी करून ३ मैल चालायला जाणार, मग हास्यजत्रेला जाणार, हे रोजच्यासारखं होणार होतं, पण आज परत येतांना जास्त दूध आणायची आठवण त्यांना करायची होती. अनंतराव बाहेर पडायला लागले तेव्हा निर्मला म्हणाली.

“दूध मला लवकर हवंय बरं का! खीर करायची आहे. तुम्हीही लवकरच या”

“आज खीर? ती कशाला?” निर्मलेने कठीण आहे तुमच्यासमोर, असा चेहरा केला तेव्हा अनंतरावांनी चेहरा वाकडा करू नकोस, कारण सांग म्हटलं. हेही रोजचंच होतं. “अहो, आज बहीण कुणाची यायची आहे जेवायला?”

“खरंच की. आज सुधी यायची आहे नाही का? येतो, लवकर.” पण त्यांचा चेहरा विचारात पडलेला पाहून तिनेच विचारलं, “काय झालं?”

“अगं, आज वृध्दाश्रमाची मिटींग ठेवली होती, तिथे जाणं जरूरीचं आहे कारण मोठी देणगी देणारे येणार आहेत, पण हे घरचं विसरूनच गेलो.” पाकीट चष्मा घेतलाय ना हे तपासत अनंतराव म्हणाले.

“बाहेरची कामं विसरत नाही तुम्ही. सुधाताई का येणार आहेत हे तरी आठवतंय का? की तेही विसरला आहात?”

“इतका काही मी मूर्ख नाही. आज उजूचं केळवण व्हायचंय आमच्या.” अनंतरावांच्या चेहऱ्यावर “सुटल्याचा” भाव होता. “मी असं करतो, दूध आधीच आणतो, आणि वॉचमनबरोबर वर पाठवून देतो, म्हणजे तुलाही बरं पडेल. मीही माझी कामं करून येतो.”

“१२ वाजता सगळी यायची आहेत, त्याआधी या म्हणजे १२ वाजण्याआधी तुमचं सगळं आवरून होईल.” अनंतरावांनी मान डोलावली आणि ते बाहेर पडले. निर्मलेने १२ ची वेळ सांगितली, पण सगळे १ वाजता यायचे होते. अनंतराव निदान १२.३० वाजेपर्यंत येणार हे तिला माहीत होतं. निर्मला मग कामाला लागली. अनंतरावांनी चालू ठेवलेले दिवे बंद केले.

ओट्यावरचा पसारा आवरला. मग शांतपणे चहाचा कप घेऊन ती पेपर वाचायला बसली. पेपर वाचून कामाला लागली. सीपाकाची सुरूवात केली इतक्यात फोन वाजला. कामाला निघालेल्या, वाटभर बोलत जाणाऱ्या, आपल्या लेकीचा फोन हे तिला घड्याळाकडे पाहिल्यावर लगेच कळलं.

“आज सुधाआत्याचं केळवण आहे ना आई? काय आहे आजचा मेनू? आणि आहेर काय करते आहेस?” सुमीने सरळ मुद्द्यालाच हात घातला.

“आज खीर आहे, आणि सुधीला साडी आणि उजूला छान लग्नाची मामाची म्हणून अष्टपुत्री साडीच घेतली आहे.”

“विजूताईंची एकसष्ठी म्हणून तिला घेतली हजार रुपयांची, तर सुधीलाही तेवढ्याच किंमतीची घे म्हणाले. पण हे दिल्लीला गेले की विजूकडे जातात, कधी तिथेच राहतात म्हणून तिला जरा जास्त किंमतीची घेतली. पण ह्यांना कुठे तो हिशोब कळायला? सुधीला पण हजार रूपयांची साडी काय करायची आहे? चहासुध्दा मिळत नाही तिच्याकडे कुणाला? कुणी आपल्याकडले पाहुणे आले की त्यांनाच घेऊन येते आपल्याकडे. मी त्यांना हा हिशेब सांगितल्यावर मला म्हणाले, ती कशीही वागू दे, आपण चांगलं वागलं पाहिजे. मग मीही त्यांना विचारलं की जिथे चांगले रिटर्नस् मिळतात तिथेच पैसे गुंतवतांना तुम्ही? की बुडीत कंपनीतही घालता पैसे? कंपनी कशी का चालेना आपण सर्व कंपन्यांशी चांगलं वागावं म्हणता का तुम्ही? मग गप्प बसले. त्यातून विजुताई किती प्रेमळ आणि सुधी किती खडूस. आता मला सुधीसाठी आणलेल्या साडीवर हजार रु.चं लेबल लावून ठेवायचंय....आहेर पॅक

करायचा आहे. साडी दिली की दोघी साड्या बघायला त्या काढणार तेव्हा दोघींना एकच किंमत दिसलेली बरी!” निर्मलाच्या या बोलण्यानंतर मग पलिकडून खोखो हसण्याचा आवाज ऐकू आला. “अगं करावंच लागतं असं सगळं... व्यवहार न कळणाऱ्या माणसाला समजावत कोण बसणार? सर्वांना हजार रुपयांच्या साड्या वाटत बसलं तर संसार कसा होणार?” निर्मलेने मुलीला समजावलं.

“हसू नकोस जोरात. प्रत्येक माणसाला त्याच्या भाषेत बोलावं लागतं. आपण लहान मुलांना घरी सोडून बाहेर सिनेमाला जातांना नाही का, मी डॉक्टरकडे जाऊन येते हं बबड्या, घरी आजीबरोबर बस, असं सांगून बाहेर पडत, तसंच आहे हे!” तेवढ्यात सुमीचं ऑफीस आलं आणि फोन बंद झाला. निर्मलाही कामाला लागली. निर्मलेने सगळी तयारी करून ठेवली तोपर्यंत १२ वाजले आणि अनंतरावही आले. आल्याबरोबर आंघोळ करूनच झब्बा घालूनच बाहेर आले.

“हा झब्बा?”

“याला काय झालं? तुझं ना नेहमीचं आहे. कोणताही झब्बा घातला तरी हा कशाला असंच म्हणतेस, कधी लग्नाचा आहे म्हणतेस तर कधी साधा आहे म्हणतेस”. अनंतरावांनी एकदम गोळीबारच केला.

भूक लागलेली आहे या माणसाला. निर्मला मनात म्हणाली.

“अहो, पण बघितलंत तरी का त्या झब्ब्याकडे? डाग पडलाय झब्ब्यावर मोठा पिवळया हळदीचा.”

कुठे? असं म्हणत अनंतरावांनी पाहिलं आणि म्हणाले, मागच्या वेळी घातला होता एका लग्नात, तेव्हा प्लेटमधे चटणी आणि पापड घेऊन पुढे निघालो तर त्या मोठ्या पंख्यामुळे चटणीत भिजून पापड उडाला आणि अंगावर आला. तो आहे हा डाग.” अनंतरावांचा आवाज नरमला होता.

“बुफे असला की छातीवर आणि पंगत असली की मांडीवर जेवणाचा डाग कसा पाडता येतो तुम्हाला? आल्यावर एवढा व्यवस्थित घडी कशाला करून ठेवायचा तो? आणि सुमी उद्या महाबळेश्वरला जाणार आहे ते नाही सांगितलंत मला. मी उद्या जाणार होते तिच्याकडे.” निर्मलाही आता कावली. अनंतराव निमूटपणे आत गेले आणि कपडे बदलून आले.

“देवधरांचा आठवण करायला फोन आला होता. आज रात्री ९ वाजता सगळे मित्र जमणार आहात सिझन्स हॉटेलमधे लक्षात आहे ना? आणि लीनाचा फोन आला होता, की तिला तिच्या आमंत्रण पत्रिकेवर लिहायला आपला पत्ता हवा आहे, तो तुम्ही कळवलाच नाही. लीनाचं लग्न ठरलेलं सांगितलंच नाहीत तुम्ही मला. लीना म्हणाली की काकांना सांगितलं होतं मी. त्यांनीच फोन घेतला होता. कसे विसरता हे सगळं.”

एवढ्यात बेल वाजली. त्यामुळे अनंतराव सुटले. सगळी पाहुणी घरात शिरली. जागा पकडून बसली. गप्पा सुरू झाल्या.कसं वाटतंय अनंतराव रिटायर झाल्यावर? श्रीपादरावांनी विचारलं.

“वेळ कुठे शिल्लक असतो आता. नोकरीपेक्षा जास्त वेळ बिझी झालोय. अनंतरावांनी कौतुकाने सांगितलं. अहो, साडेपाचला उठतो, हास्यक्लबला जातो, तिथून चालायला ३ मैल जातो, मग वृध्दाश्रमाचं काम करतो आणि तिथून घरी येतो. घरी आलो की पेपर आंघोळ वगैरे सगळं झालं की थोडी झोप घेतो आणि ५ वाजता परत बाहेर पडतो.”

“परत चालायला?”

“नाही समाजकार्य करायला.”

“वहिनी, तुम्हीपण जाता हास्यक्लबला?”

“मी कशाला जाऊ! घरातच गप्पा मारल्या तर हसणं झालं होतं की माझं!”

अनंतरावांनी तिचा चिमटा दुर्लक्षित केला. मी सकाळी १० ते ११ आणि संध्याकाली ५ ते ७ वाजेपर्यंत बागेमधे येणाऱ्या नानानानींना नवीन आलेला माहिती अधिकाराचा कायदा, त्याचा फॉर्म कुठे मिळतो, तो कसा भरायचा अशी त्यांची कामं करून देत बसतो. तुम्ही का भरून देता ही माहिती? आणि फायदा होतो का त्याचा या श्रीपादरावांच्या एका वाक्यावर अनंतरावांनी आपली गाडी

सोडली आणि सगळी माहिती, अनुभव सांगायला सुरूवात केली. कुणाला कसा फायदा झाला तेही सांगितलं,

“म्हणजे रिटायर झाल्यापासून घरात नसताच तुम्ही की काय?”

“बघा म्हणजे झालं. दिवसभर बाहेरच असतात. वृध्दाश्रमाला कुणी देणगी देतंय म्हटलं की हे स्वत: जातात आणि त्या वस्तू, रक्कम घेऊन येतात. दुपारच्या जेवणाला आणि रात्रीच्या झोपण्याला फक्त घरात.” निर्मलेनेही संधी सोडली नाही. सुधी आणि त्यांची मुलं नुसती हसत होती आणि अनंतराव ऐकूच येत नाही अशा चेहऱ्याने बसले होते. खूप गप्पा रंगल्या. श्रीपादरावांना गॉसिप्समधे खूप इंटरेस्ट होता, पण अनंतरावांना त्यात अजिबात रस नव्हता, काय तेच तेच बोलत असता तुम्ही असं म्हणत ते ऊठू जात असत. मग जेवणं झाली. आहेर देऊन झाले, सुधीला नेमकी विजूताईंसाठी घेतलेलीच साडी आवडली. तिचं नेहमीचंच होतं ते! तिने हळूच दोन्ही साड्यांवरची किंमतीची लेबलं पाहिली ते निर्मलेच्या चाणाक्ष नजरेतून सुटलं नाहीच. दुपारच्या झोपा झाल्या. अनंतराव घड्याळाकडे पाहात चुळबुळत बसले कारण ४.३० ला त्यांना बागेत लोकांची कामं करायला जायला निघायचं होतं. चहाशिवाय कसं जायचं. तेवढ्यात श्रीपादरावही उठले.

“तुमच्या बहिणीला सांगा चहा करायला.” त्यांनीच सुचवलं.

“झोपली आहे ती!”

"सिरियल चालू करा एखादी. टी. व्ही. चा आवाज ऐकला की उठेल. नाहीतर वहिनींचा चहा होईपर्यंत वाट पाहात झोपून राहील."

तसंच झालं निर्मलेनेच चहा केला. सगळेजण चहा घेऊन बाहेर पडले. अनंतराव पहिले सटकले. सगळी गेल्यावर निर्मला घर आवरायला लागली. इतक्यात बेल वाजली. दारात शेजारचे सुब्रमण्यम् उभे होते. चार दिवसांपूर्वी अनंतरावांनी एका मोठ्या डॉक्टरचा नंबर देतो असं सांगून ठेवलं होतं, पण त्यांना दिला नव्हता. म्हणून ते विचारायला आले होते. निर्मलाने तिच्या फोनमधे शोधायला सुरूवात केली तर ते म्हणाले की अनंतरावांच्या ओळखीने ते त्यांची अपॉइंटमेंट घेऊन जाणार होते. ते काम झालं की नाही ते त्यांना हवं होतं कारण त्यांच्या आईचा पाय आज खूपच दुखायला लागला होता. निर्मलाने मग अनंतरावांचा नंबर खूप वेळा फिरवून बघितला पण त्यांनी उचलला नाही. शेवटी सुब्रमणियम् तसेच हिरमुसले होऊन गेले. निर्मलेला त्यांचा चेहरा पाहावला नाही. पाठोपाठ नानानानी बागेतल्या माळयाचा फोन आला. अनंतरावांनी उध्दारायला घेतलेल्या त्या बागेसाठी मातीचा ट्रक आला होता. परत मोबाईल नंबर फिरवून बघितला पण अनंतरावांनी उचलला नाही. तोपर्यंत अनंतराव नक्की बागेत पोचले असतील म्हणून तिने बागेमधे येणाऱ्या त्यांच्या एका मित्राला फोन केला तर अनंतराव एका गृहस्थांना घेऊन वकिलाकडे जायचे होते असं त्यांनी सांगितलं.

तासन् तास नंबर फिरवून निर्मला दमली. निर्मलेला कळेना की हा माणूस फोन का बंद ठेवतो आहे. परत तिने वकिलाकडे गेलेल्या गृहस्थांचा नंबर माहीत

आहे का असं विचारून त्यांच्याकडून तो नंबर घेतला. त्या गृहस्थांनी फोन घेतला तेव्हा अत्यंत संयमाने तिने अनंतराव आहेत का विचारलं. शेजारीच बसले आहेत की, असं म्हणत त्यांनी अनंतररावांना आपला फोन दिला.

निर्मलाने अगदी खालच्या पट्टीत अनंतरावांना विचारलं,

“माहितीच्या अधिकारात मला तीन प्रश्नांची उत्तरं कळतील का? एक सुब्रमणियम् यांच्या डॉक्टर अपॉइंटमेंटचं काय झालं? बागेतल्या माळ्याने माती कुठे टाकायची आहे? आणि मि. अनंतराव घरी कधी येणार आहेत. ते आपला मोबाईल चालू करतील का?”

निर्मलेला नक्की खात्री होती की त्यांनी काल रात्री झोपण्यापूर्वी, सायलेंट करून ठेवलेला फोन अजून साऊंडमधे घातला नव्हता. गावभर माहिती देत हिंडणाऱ्या अनंतरावांवर रागावलेल्या निर्मलाने मग टी.व्ही. इतक्या जोरात लावला की तिच्या मनातली वाक्यंही तिला ऐकू आली नाहीत.

----------------------------------------------------------

# देवच तुमचे रक्षण करो.

सगळा महाल उपस्थितांनी गच्च भरला होता. सर्वांची उत्सुकता शिगेला पोचली होती. आपल्या देशाला, स्वराज्याला, राज्याला, डोंगर दऱ्या, माळरानं, शेतं, नद्या, सरोवरं, तलाव, मंदिरं, देखण्या वास्तू या, याची देही याची डोळां परत एकवार पहाण्याची संधी मिळणार म्हणून कित्येकांचे डोळे आंसवांनी भरून आले होते. इतकं लांब, इतकं दीर्घकाळ देशापासून दूर राहिल्यावर पुढची पिढी पाहायला आणि तिचे विचार जाणून घ्यायला सर्वांच्या मनात हुरहूर होती. आपल्याबद्दल लोक काय म्हणतात हेही त्यांना जाणून घ्यायचं होतं. आपण लावलेल्या विचारवृक्षांना किती बहर आलाय तेही बघायचं होतं.

नुकताच आला होता एक नवागत. तरूण होता. तंत्रज्ञान विज्ञानाचा विद्यार्थी होता. त्या नवागताने प्रेक्षकगृहातील एक चौकोनी मोठा डबा आणून ठेवला. मग एक चपटी डबी बाहेर काढली. हातातील चपट्या डबीवरची बटणं तो दाबायला लागला आणि अचानक त्या रिकाम्या दिसणाऱ्या खोक्यावर प्रकाश पडला. त्यावर चित्र उमटलं. माणसं दिसायला लागली. ती बोलायलाही लागली. युरोपात सिनेमा नावाची नाटकं सुरू झाल्याचं त्यांना माहीत होतं पण हे नवीन भानगड ऐकली नव्हती.

“हे काय चाललंय तुझं? काय म्हणतात याला…?”

“याला टी. व्ही. म्हणतात. जगात कुठेही काहीही घडलं तरी त्या क्षणी या यंत्रावर लगेच जगभरच्या लोकांना ते त्या क्षणी पाहायला मिळतं. हे नवयुगाचं मोठं संशोधन आहे. आपण याला दूरदर्शन म्हणतो. माझ्या हातात आहे त्याला रिमोट म्हणतात आणि जी ही छोटी तबकडी आहे त्याला सी. डी. म्हणतात.” नवागताने माहिती पुरवली. या सी. डी.वर मी आपल्या देशातील सर्व हकीकत, वास्तव मी रेकॉर्ड करून आणलं आहे ते आता मी तुम्हाला दाखवणार आहे. सी. डी. म्हणजे काँपॅक्ट डिस्क. तुम्हाला आताच्या देशाचं दर्शन होईल.

आणि मग त्या स्क्रीनवर एकापाठोपाठ चित्र उमटायला लागली. समुद्रावरून एक हेलिकॉप्टर आकाशात उडतांना दिसायला लागलं आणि त्या खालचं मोठं शहर सर्वांनी पाहिलं. विमान पुढे सरकत होतं आणि नवनवीन भाग दिसायला लागला होता. ते विमान सर्व दृष्य आपल्याला दाखवतंय असं त्या तरूणाने उपस्थितांना सांगितलं. एकेक चित्र पुढे सरकत होतं. नवागताला प्रश्न विचारणं आणि त्याने उत्तर देणं सुरू झालं होतं. सर्वांच्या नजरांमधे विलक्षण कुतूहल होतं. “आमच्या वेळी नव्हतं असं काही. थोडक्यात म्हणजे हा तुमचा संजय उवाचच झाला…” गोपाळराव म्हणाले.

गोपाळरावांनी असं म्हटल्यावर नवागत म्हणाला, “संजय उवाच नावाची कोणतीही कंपनी नाही आहे. हे असे टी. व्ही. बनवणारे परदेशी लोक आहेत.” उपस्थितांनी एकमेकांकडे पाहिलं आणि नव्या पिढीचा, त्यांच्या ज्ञानाचा त्यांना अंदाज आला.

“आपल्या महाराष्ट्रात बनतं का हे?”

“छे! हे वैज्ञानिक शोध सगळे युरोप, जपान अमेरिकेत लागले की आपण ते वापरतो. त्या लोकांनी धुण्याची, भांडी घासण्याची, सगळयासाठी मशिनं बनवली. आपल्या देशात काहीही बनत नव्हतं.”

“आमच्या वेळी तंत्रज्ञान देणारं कॉलेज नव्हतं, पण आता तर निघाली आहेत ना आपल्या देशात इंजिनिअरिंग कॉलेजं. मग आपले तरूण का शोध लावत नाहीत? स्वस्त नाही का पडणार ते?”

“आपल्याकडे संशोधनात जास्त पगार मिळत नाही. म्हणून सगळे बुध्दिमान तरूण इंजिनियर झाले की परदेशी मोठ्या पगारावर जातात. शिवाय आपल्याकडे गरिबी आणि मनुष्यबळ इतकं आहे की आपल्याला या तांत्रिक मशिनस् लागतही नाहीत. त्यांच्याकडे मनुष्यबळ कमी हाच मोठा प्रश्न आहे. आपण तंत्रज्ञानात फार मागे आहोत. आपल्याला आवडच नाही त्याची. आपल्याकडे सतत वीज पुरवठा होण्याइतकी वीजही बनत नाही. ही पहा…ही पहा… तुमची मुंबई युनिव्हर्सिटी.”

“आमची मुंबई युनिव्हर्सिटी…. तेव्हा परिसर किती मोकळा होता आणि आता काय ही गर्दी. तेव्हा आम्ही परीक्षा देत होतो एका मांडवाखाली. त्यामुळे परीक्षा देणं म्हणजे मांडवाखालून जाणं असंच म्हणायचे लोक. इथे मुलं शिकतात आणि परदेशात नोकरी मिळवतात असं म्हणालात तुम्ही. म्हणजे आपण शिक्षण द्यायचं, आपण मुलांवर खर्च करायचा आणि त्याचा उपयोग

परदेशाने करून घ्यायचा? हे तर आमच्यावेळी भारताला सर्वांनीच पिळून काढलं, आणि आता मुलांची हुशारी वापरायला लागले तसंच झालं. आमच्यावेळी मुंबई, पुणे इथे किती छान कॉलेजं निघाली, त्याचं काय झालं. त्यांच्या शाखा पसरल्या नाहीत का?'' माधवरावांनी विचारलं तेव्हा सर्वांच्याच चेहऱ्यावर एकच काळजीचे भाव होते.

''कॉलेजं खूप निघाली आहेत पण गुणवत्तेत खूप घसरली आहेत. अनेक कॉलेजं राजकारण्यांनी काढली आहेत. काही दानशूर उद्योजकांची आहेत. पण शिक्षणाची पत खालावली आहे. हे एक पैसा करण्याचं माध्यम झालंय. मुलं आता साक्षर होतात पण ज्ञानी होतातच असं नाही. तुमच्या वेळचा बॅरिस्टर हा शब्द आता किती शाळकरी मुलांना लिहिता येईल याची शंकाच आहे.''

''शिक्षणाचं व्रत घेतलेले एवढे राजकारणी झालेत या देशात? राजकारणी आणि पैसा? आम्हीही राजकारण केलं पण ती सूळावरची पोळी होती. आम्ही पैसा केला नाही त्यातून. कुटुंबाला काहीही ठेवलं नाही. नाही का हो मोहनदास?'' सुपारी कातरत बळवंतराव म्हणाले.

''आता उलट झालंय बापू'' राजकारण हा व्यवसाय झालाय, काहीही नीतीनियम, निष्ठा, देशप्रेम नसलेला. बक्कळ पैसा मिळवतात हे राजकारणी. तुम्ही वर आल्यानंतर देश स्वतंत्र झाला. आपल्या देशात लोकशाही आली. म्हणजे इंग्रजांनी ती थोपली. ती निवडणुकीच्या मार्गाने जाते. निवडणूक जिंकली की सत्ता मिळते तीही ५ वर्षांसाठी. मग या निवडणूकीत पक्ष खूप पैसा ओततात. आणि मग सत्तेत असतांना वसूलही करतात. त्यासाठी राजकारणी सारखे

संसदेतील रांगा बदलतात, पक्ष बदलतात..कारभार केला नाही केला तरी त्यांच्यावर जबाबदारी काहीच पडत नाही. ”

“म्हणूनच मी म्हणालो होतो की आपल्या देशाला प्रचंड पैसा लागणारी लोकशाही नाही चालणार. आमच्या लोकांची मनोवृत्ती राजेशाहीचा शतकानुशतके संस्कार झालेली आहे. आम्हाला aristocracy with wisdom जास्त भावेल.”

“तुम्ही म्हणता ना तेच चाललंय आपल्या देशात! फक्त विज्डमचा अभाव आहे. आमचे पक्षप्रमुख मुकुट घालत नाहीत एवढंच. तुम्ही फार लौकर देश सोडलात. तुम्हालाही हे निवडणुकीचं राजकारण जमलं नसतं.” नवागत हसत म्हणाला.

“एवढी गर्दी आपल्या महाराष्ट्रात? एवढे मराठी? आणि ही आत्ता दिसली ती कोणती नगरी?” भाऊ दाजींनी आश्चर्याने विचारलं.

“नाही. हे सर्व भारतभरचे लोक आहेत. मुंबईत माती विकली तरी पैसा मिळतो म्हणून सगळे जमले आहेत इथे.”

“मग त्यांची राज्यं काय करतात? या सगळ्या सुविधा त्यांना आपल्या राज्यात मिळत नाहीत? प्रत्येक राज्यात एक मुंबई अजूनही नाही? स्वतंत्र झालेल्या आपल्या देशात मग होतंय तरी काय?”

“ही तुमचीच प्रचंड वाढलेली आणि उपनगरांनी भरलेली मुंबई. ओळखली नाहीत ना?” नवागताने हसून विचारलं.

“शिवरामबापू, एक कळलं का तुम्हाला? पाहिलंत का हे उडणारं पुष्पक विमान? मी तुम्हाला सल्ला दिला तो ऐकला नाहीत, धर्माच्या नावाखाली तुम्ही शोध लावायला युरोपात गेला नाहीत, आणि युरोपियनांनी बघा किती प्रगती केली. तुमचा अधिकार त्यांनी अभ्यासाने आणि मेहनतीने साध्य केला.” माधवराव शिवरामबापूंना म्हणाले.

“हे शिवरामबापू धर्माला चिकटून बसले. या धर्मानेच सगळ्यांना जखडून ठेवलं. सगळीकडे दलदल साचली. जातीपातीची जलपर्णी तुंबली.” ज्योतिबा चिडून म्हणाले.

“हे विमान नाही. हेलिकॉप्टर आहे. विमानं प्रचंड मोठी असतात. त्यात ३००/४०० लोक बसू शकतात. मुंबई ते लंडन ८ तासात पोचतं ते विमान. खाणं-पिणं-झोपणं-जेवणं, सगळ्या सोयी असतात यात.”

सगळेच थक्क झाले होते ते दृष्य बघतांना. “एवढी लोकसंख्या? शिल्लक आहे की नाही कुटुंबनियोजन वगैरे या देशात? रघुनाथरावांनी कळवळून विचारलं. “आणि त्या मुंबईच्या गिरण्यांची धुराडी दिसत नाहीत ती?” श्रीपाद अमृत शोधक नजरेने म्हणाले.

“विसरा ती तुमच्या वेळची जुनी मुंबई. गिरण्या संपल्या कामगार बेघर झाले. ते परत कोकणात तरी गेले नाहीतर कुठेतरी जगायला लागले. गिरणी मालकांच्या मोठ्या मोठ्या जमिनी बिल्डर लोकांनी उचलल्या. आता तोच मोठा व्यवसाय झालाय. मोठ मोठ्या इमारती मुंबईत आकाशाला हात

लावायला लागल्या आहेत. आता ही बघा. सगळयात मोठी वस्ती. हिला धारावी म्हणतात. इथे खूप उद्योग चालतात. कोट्यावधीचा व्यवसाय होतो. मोठा महसूल मिळतो. मुंबईतल्या जमिनीला सोन्याचा भाव आहे. आणि ती टॉलस्टॉयची ती गोष्ट, माणसाला किती जमीन लागते ती… ती आता हास्यास्पद मानली जाते.''

''मग अशी गलिच्छ झोपड्यांची वस्ती का? त्यांना चांगलं आरोग्य, वीज, पाणी, घरं का नाहीत? आणि तो पाण्याचा लोट कसला रे?''

''राजकीय अनास्था, बाकी काही नाही. तो पाण्याचा लोट नाही, मिठी नदी आहे ती!'' ती नदी बघून सगळयांचा जीव कळवळला.

''प्रगती झाली तर हरकत नाही पण व्यवसाय बंद होणं, कामगारांचा रोजगार जाणं ही चिंतेची बाब नाही का?'' कापड गिरण्या बंद झाल्या म्हणून कळवळलेले, आणि अजूनही स्वत:ला कॉम्रेड म्हणवून घेणारे श्रीपादराव निराशेने म्हणाले.

''नाही काका, रोजगाराचं स्वरूप बदललं. इथे मोठेमोठे चकाचक, सुंदर सजावटीचे मॉल निघाले त्यात तरूण मुलांना छोट्या मोठ्या नोकऱ्या मिळाल्या. गिरणीने कात टाकली म्हणा हवं तर.''

त्या हेलिकॉप्टरने मुंबई सोडली. ते दक्षिणेकडे जाऊ लागलं. त्या अथांग समुद्राचं दर्शन घेत सगळे सुखावले. ''आता आपण पुण्याकडे जात आहोत.'' नवागताने माहिती पुरवली. श्वास रोखून सर्वजण सह्याद्रीच्या माथ्याचं दर्शन घेऊ

लागले. कणखर सह्य पर्वत, त्याची शिखरं. तो लोहगड, सगळे डोळयांमधे प्राण ओतून ते पाहायला लागले. पुणं जवळ यायला लागलं. वाटेतलं पवना, मुळा, मुठा, संगम, आता बघायला मिळेल म्हणून सगळे भारावले. त्या सर्वांच्या आयुष्याची नाळ त्या नद्यांशी जुळली होती. त्यांचा जीवन प्रवाह आणि जीवनरस त्या नद्याच होत्या.

"केवढा हा कचरा रे रस्त्यावर? बघवत नाही आहे मला." देबूजी असहायपणे उदगारले. किती रे या नद्या घाणेरड्या. मगाशी मिठी नदीला सांडपाण्याने घाण झालेलं मी पाहिलं, काही बोललो नाही... पण या अमृतवाहिनी नद्याही तुम्ही मारून टाकल्यात? सुशिक्षित ना रे तुम्ही? मी अडाणी होतो, पण स्वच्छता शिकवायला हाती झाडू घेतला. वाटलं होतं, हे माझे संस्कार तुमच्यावर होतील आणि तुम्ही स्वच्छता शिकाल. पण काय हे पुणं? ती मगाशी दिसलेली मुंबई! इतकं घाणेरडं राहता तुम्ही? लहानपणापासून मुलांवर स्वच्छतेचे संस्कार का नाही रे करत तुम्ही? का नाही त्यांना घरातूनच श्वच्छता शिकवली जात?" देबूजींचा आवाज चढला होता. "आपल्या नद्यांचं, मातीचं, आयुष्याचं, प्रेमच नही का रे तुम्हाला?" देबूजींनी कळवळून विचारलं.

"तुमच्या सगळ्याचं सगळं आयुष्य केरात गेलं हं आजोबांनो. फक्त ज्योतिराव, गोपाळराव, आणि धोंडो केशव यांच्या कार्याला गोड फळं लागली आहेत. मुली खूप शिकताहेत, स्वतंत्र व्यवसाय करतात, विमानं देखील चालवतात, भरपूर पैसा मिळवतात, आणि स्वतंत्र विचारांनी जगतात. त्या घरही सांभाळतात आणि मोठ्या अधिकाराच्या जागांवरही यशस्वी होतात. पण आता

उलट झालंय. त्यांना स्वतंत्र राहण्याची चटक लागली आहे. हातात पैसा असतो, शिक्षण असतं, जे पुरुषांनी केलं तेच आता कमावत्या स्त्रिया करत आहेत. आता घटस्फोटाचं प्रमाण खूप वाढलं आहे. आता गोपाळराव, तुम्हाला नव्याने सुधारक काढायला लागणार...! नवागत हसून म्हणाला.” नवागताच्या वाक्यांनी सगळेच सुखावले.

“हो, पण जातीभेद संपला की नाही? ते जाळं फाटलं की नाही?”

नवगताने निराशेने नकारार्थी मान हलवली. ती जाणं शक्य नाही, कारण राजकारण्यांच्या सत्तेच्या गणिताची ती चावी आहे. धर्म हा शब्दही त्यांचं हत्यार आहे. त्या दोन शस्त्रांनी ते लढतात आणि जिंकतात, आणि जिंकले की सगळ्यांना जनतेला विसरतात... मुकी बहिरी जनता पुढची ५ वर्षे सगळं सहन करते, मग परत निवडणूका, परत सत्तांतर. राज्याराज्यात भाषेवरून फूट. एकसंघ भावना नाही. वाटेल त्या मार्गाने पैसा हाच धर्म आहे या नवीन भारताचा. अनीती हाच मंत्र झालाय आता. मग तो डॉक्टर असो वा इंजिनियर. खूप लोक आपल्या व्यवसायाशी निष्ठा ठेवून आहेत पण मग ते मोठे होत नाहीत. प्रतिष्ठित होत नाहीत. जे गुन्हे करतात तेच परदेशात जाऊन सुखी होतात..”

“आपल्या देशाला अजून एक भाषा नाही? मग कुठली भाषा चालते देशात आपल्या?”

“कसलं भाषेचं घेऊन बसलात तुम्ही लोक आजोबा? अहो, सगळे इंग्लीश भाषा बोलतात आपल्या देशात. आई मुलांशी इंग्लिशमधे बोलते,

सगळ्या मातृभाषा मृतवत झाल्या आहेत. आपल्या भाषा आता फक्त गावाकडे शिल्लक आहेत. तुम्ही थक्क व्हाल मी हे तुम्हाला मी सांगितलं तर की आम्ही आमच्या शिवाजी महाराज स्थानकालासुध्दा छत्रपती शिवाजीच्या ऐवजी सी.एस.टी. म्हणतो... टी म्हणजे टर्मिनस हां... उगीच गैरसमज करून घेऊ नका.”

अचानक उपस्थितांमधे शांतता पसरली. “आम्हाला तर काहीच ऐकवत नाही आहे हे तुझं बोलणं, आणि हा आपल्या स्वतंत्र देशाचा चेहरा. कुठे गेली ती आमची पंजाब सिंध गुजरात मराठा ही जन्मभूमी. कशाला रचली आम्ही वंदे मातरम् गीतं? कशाला खाल्ल्या इंग्रजांच्या गोळ्या? कशाला सोसली काळ्या पाण्याची शिक्षा? देशाच्या विविध राज्यातील क्रांतीकारक गोळ्या खाऊन शहीद झाले आणि ते काय त्या राज्यापुरते उरले?”

“जायचं का परत आपल्या देशात?” विनायक दामोदरने पोटतिडिकेने विचारलं.

“आम्हीही तोच विचार करतोय.” बळवंतराव म्हणला. ज्योतिबांनी, देबूजींनी हात उंचावून आपला पाठिंबा जाहीर केला.

“वेडे की काय तुम्ही?” भारतात परत येणार? त्यापेक्षा युरोप, अमेरिकेत जा. आता इंग्लंड मागे पडलंय, त्याचाही प्रभाव संपलाय. आता महासत्तेचं केंद्र सरकलंय आणि अमेरिका गाजते आहे. तिथे रस्ते चकाचक असतात. आपली सगळी मुलं तिथेच राहतात. देबूजींना आवडतील ती स्वच्छ शहरं. तिथे सर्व

कर्ममचारी आपापली कामं निष्ठेने करतात. तिथे स्त्री स्वातंत्र्य भरपूर आहे. कपडे हालचालींना पूरक असतात, तिथे सायन्स खूप पुढे गेलंय. ज्ञानाला, विज्ञानाला खूप आर्थिक बळ आहे. जातपात, अंधविश्वास, कर्मकांड असं तिथे काही चालत नाही, तिथे जातीभेद नाहीत, गोपाळराव खूष होतील अमेरिकेत गेल्यावर. तिथे गुणांचं चीज आहे, तिथे खरी लोकशाही आहे. लोकशाहीच्या नावात गुंडाळलेली राजेशाही नाही. तिथे जन्म घ्या, सुखाने रहा, तिथल्या प्रत्येकाला आपल्या कामाचा, आपल्या देशाचा, आपल्या भाषेचा मनस्वी अभिमान आहे. ते त्यांच्याच भाषेत बोलतात. दुसरी भाषा नाही आली तर तर त्यांना न्यूनगंड नसतो. ते सर्वनियम कसोशीने पाळतात, शिस्तीने वागतात, तुम्हाला आवडेल असं सगळं तिथे आहे. तिकडेच राहायला जा.” नवागताने कळकळीने सर्वांना विनवलं.

“पण तिथे आम्हाला काहीच काम राहणार नाही. आम्हाला आमचा देशच सुंदर करायचा आहे. परत नव्याने घडवायचा आहे. पण तुझ्या त्या डब्यात चमकण्यापुरतं नव्हे. आयुष्य वेचायचं आहे परत आमच्या गतजन्मीच्या कार्यात आम्हाला. आमचं काम अर्धवट राहिलंय हे पाहिलं आहे आम्ही आत्ताच. आम्ही आमच्या गुरूच्या कानावर घालतो आणि भारतात येतो.” सगळ्यांनी एकमुखाने आपला निर्णय जाहीर केला.

“तुमचे गुरु? कोण ते?”

“मगाशी तू ज्यांना सि.एस.टी. म्हणालास ना, ते छत्रपती शिवाजी महाराज!. त्यांच्या कानावर घालून येतो”

“मला वाटलं होतं की तुम्हाला तुमचा देश बघितल्यावर निराशा येईल. पण आहात खरे चिवट देशप्रेमी. तुम्ही सगळे भारतात जन्मणार असाल तर मग मीही तुमच्याबरोबर परत माझ्या मातृभूमीतच जन्म घेतो. खरं तर मला परत त्या देशात जन्म घ्यावा असं वाटत नव्हतं. तुमच्या या आशादायक उत्साहाचं देवच रक्षण करो. आपल्या देशाला परत तुम्हा सर्वांचीच गरज आहे.”

सी. डी. बंद करून नवागतासह ज्योतिबा, देबूजी, गोपाळराव, विठ्ठलराव, बळवंतराव, माधवराव, इतरही सगळेच निघाले.

---------------------------------------------------

# माळेचे मागचे मोती.

सत्कार समारंभ लहानच होता. एका शाळेचा एक वर्ग घेतला होता. बाकांवरतीच उपस्थितांची बसण्याची सोय होती. म्हणजे खुर्च्यांचा खर्च वाचला होता. हा वर्गही सुटीचा दिवस पाहून, ओळखीनेच मिळवला होता. कारण प्रेक्षकही साधेच होते. आमंत्रित अध्यक्ष म्हणून सन्माननीय व्यक्ती फार मोठी नव्हती, पण प्रसिध्द होती. हॉल छोटा, समारंभाचं कारण छोटं, ज्यांचा सत्कार व्हायचा तेही छोटे, त्यांचं कार्यही छोटंच, पण तरीसुध्दा ते छोटं कार्य करणारे सन्मानाला पात्र होते. एखाद्या मोठ्या बॅनरखाली निघालेल्या सिनेमात नाही का, नायक नायिका खूप प्रसिध्द असतात, त्याचं कामही खूप गाजतं, पण त्यात असलेले ड्रायव्हर, पोस्टमन, ग़डी, दुकानदार, मॉबसीनमधले कलाकार, यांची कामं छोटी असली तरी त्यांच्याशिवाय सिनेमा नाही पूर्ण होऊ शकत..

आजचा विष्णूदादांचा सत्कार असाच होता. पक्षातील काही कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन, दादांचं काम लोकांना कळावं आणि त्यांचा गौरव व्हावा म्हणून हा सत्कार घडवून आणला होता. दादांना खरं तर तेवढही नको होतं, पण ते नको म्हणणं पक्षाने ऐकलं नाही. टेबल-खुर्ची, हार-तुरे, शाल श्रीफल, अध्यक्ष- प्रमुख पाहुणे या प्रत्येक समारंभाला लागणाऱ्या जोड्याही तिथे तयारच होत्या. दादांचं नाव आणि वर्गक्रमांक, शाळेच्या प्रवेशद्वाराशी कुणीतरी आपल्या दिव्य हस्ताक्षरात, खडूने, तिरप्या जाणाऱ्या ओळीत लिहून

ठेवला होता. खडू कुठे ठळक तर कुठे पुसट झाला होता. दादा, त्यांचा परिवार, त्यांच्या पत्नी शाळेत आले तेव्हा दादांचे कपडे रोजचेच, इतके साधे होते की ही सत्कार मूर्ती आहे असं कुणाला जाणवलंही नाही. दादा वेळेचे मोठे भोक्ते. ते ठरलेल्या वेळी आले. जे कुणी उपस्थित होते त्यांनी दादांना वर्गात नेऊन पहिल्या रांगेत बसवलं.

लोकप्रिय असलेले प्रमुख पाहुणे पोचले. समारंभ सुरू झाला. नेहमी प्रेक्षकांमधे बसणारे ८० वर्षांचे दादा आज प्रमुख पाहुण्यांबरोबर वर्गाच्या व्यासपीठावर बसले होते. त्या कार्यक्रमासाठी जमलेले श्रोते दादांचेच आप्त, स्नेही, शेजारी, काही स्थानिक पक्ष कार्यकर्ते होते. त्यांच्यातील अनेकजण त्याच शाळेत शिकलेले होते. तेव्हा एका बाकावर बसणारे तिघेजण आता सुटलेलं पोट, स्थूल शरीरामुळे एका बाकावर कसेबसे घुसून तीन बाकांवर बसले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आयोजकांनी प्रास्ताविक समारंभाचं कारण, दादांची माहिती, आणि प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. त्यातच ज्यांनी ज्यांनी या कार्यक्रमासाठी हारतुरे वगैरे साहित्य पुरवले होते, त्यांचे आणि उपस्थित, यांचेही आभार मानणे उरकून टाकले. शेवटी ही वाक्यं ठेवली तर ऐकायला कुणी थांबत नाही हा त्यांचा नेहमीचा अनुभव होता. पैसे घेऊन पुरवल्या जाणाऱ्या सेवेबद्दल आभार का मानायचे? उपस्थितांचे आभार मात्र मनापासून बाहेर पडले कारण ते येतील की नाही, नाहीच कुणी आलं तर कार्यक्रम कसा पोकळ दाण्यासासारखा दिसेल याचं ओझं सर्वच आयोजकांप्रमाणे त्यांच्याही डोक्यावर होतं. पण दादांच्या चाळीतील सर्वजण आल्यामुळे आयोजकांना हुश्श झालं

होतं. शाळेच्या बाहेर रोज वडे विकणाऱ्या बटाटेवडेवाल्यानेही त्याच्या मागणी - पुरवठयाचा अंदाज केला होता. त्याचे चमचमीत वडे खूपच प्रसिध्द होते त्या भागात. काहीकाहीनीं तर शाळेत आत जातांनाच आपली डिमांड सांगून ठेवली होती.

मग प्रमुख पाहुण्यांनी भाषणाला सुरुवात केली. दादांची पक्षाबद्दल असलेली निष्ठा, त्यांच्याशी असलेलं घनिष्ठ नातं, याची माहिती सांगितली. तरूणपणापासून आजपर्यंत पक्षासाठी दादांनी केलेली योगदानाची यादी वाचली. आपल्या पक्षामधे आणि इतर पक्षांमधे काय फरक आहे, आपल्याकडे कसे वरच्या पातळीवरचे कार्यक्षम, लोकप्रिय नेते आहेत, मग काही चिमटे इतर पक्षांना, काही टपल्या कार्यकर्त्यांना, काढत, स्वत:मधल्या “मी” च्या थोर गुणांची खैरात करत, भाषण रंगतदार करत त्यांनी भाषण संपवलं. दादांबद्दल बोलण्यात फारसा काही मजकूर नसल्यामुळे त्यांनी असा वेळ भरून काढला. त्यांची वक्तृत्त्व कलाही ओघवती आणि रंगतदार असल्यामुळे श्रोत्यांना मजा आली. दादांनाही या भाषणामुळे, आपल्याबद्दल समाजात काय स्थान आहे, काय ओळख आहे याचं प्रत्यक्ष दर्शन झालं. दादांच्या स्तुतीच्या काही काही वाक्यांना टाळया वाजवून श्रोतेही आपली सहमतीही दाखवत होते. त्यामुळे दादा मनोमन सुखावले.

पाहुण्याचं भाषण संपल्यावर मग दादा बोलायला उभे राहिले. माईकवाल्याने दादांच्या उंचीइतकी स्टॅंडची उंची कमी केली. आधी त्यांनी आयोजकांचे आणि उपस्थितांचे आभार मानले. प्रमुख पाहुणे हे पक्षासाठी

किती अभिमानाचे आहेत, त्यांची किती वर्षांची ओळख आहे हे सर्व सांगितलं. मग त्यांनी बोलायला सुरुवात केली. ते बोलायला लागले,

“खरं तर मी आमच्या पक्षात अगदी छोटा माणूस आहे. माझा सत्कार करण्याची काही जरूर नव्हती. माझा वकुब मला माहीत आहे. त्यामुळे त्याला साजेल असाच हातभार मी देशकार्यासाठी लावला. पण तो माझा वकूब पूर्णपणे वापरला. अगदी लहान लहान कामानेही आपल्या भागाला, आपल्या देशाला, मदत होऊ शकते हे मी जाणलं. मोठ्या कामांसाठी मोठी कर्तबगार माणसं असतात. पण त्यांना छोटी कामं करायला फुरसत नसते. ती आपण करावीत या भावनेने मी वागत गेलो. देशातील प्रत्येक नागरिकाने स्वत:च्या आधी देशाचा विचार करणं महत्त्वाचं असायला पाहिजे. असं स्वत:ला सुधारलं तर देश सुधारायला वेळ लागणार नाही. म्हणून हातून जेवढं चंगलं काम करता येईल तेवढं निष्ठेने करत आलो. नजरेला खटकणाऱ्या प्रत्येक गोष्टीला निवारायला सुरुवात केली.

मग मी काय करतो? सकाळचं चहा झाला की माझी कपबशी मीच धुवून ठेवतो. ते फक्त घरातच नाही, तर ज्यांच्याकडे जातो, त्यांनी चहा दिल्यावर मी स्वत: कपबशी आत नेऊन ठेवतो आणि विसळून टाकतो. अगदी, त्या घरातील गृहिणी नको नको म्हणत असतांनाही. ज्या बाईंना मी माझ्यासाठी चहा करायचा त्रास दिला आहे, त्यांचा त्रास मी नको का कमी करायला एवढाच साधा विचार त्यामागे असतो. सकाळी फिरायला जातांना पावलांखाली येणारा कचरा रस्त्याच्या कडेला सरकवून ठेवतो. रस्ता स्वच्छ दिसला की खिती छान

वाटतं नाही का? संध्याकाळी नातवाला आणायला बसस्टॉपवर जातो तेव्हा सर्व मुलांना त्यांच्या पाण्याच्या बाटलीतील उरलेलं पाणी रस्त्यावर लावलेल्या झाडाखाली टाकायला सांगतो. आतापासून लहान मुलांना पाण्याची उधळपट्टी न करणायाचे संस्कार असावेत असं मला मनापसून वाटतं. पुस्तकातील धड्यातील घोकंपट्टीने दिलेल्या ज्ञानापेक्षा हे संस्कार सहज रुजतात. त्या झाडाचं नावही सांगतो. त्याची खाली पडलेली वाळकी पानं दाखवून त्याचं महत्त्व सांगतो. तोपर्यंत मुलांची घरं येतात. मी जेव्हा प्रवासाला जातो तेव्हा प्लॅस्टीकच्या पिशव्या बरोबर नेतो. काकड्या, बटाटेवडे, सँडव्हिच विकायला येणाऱ्यांकडून लोक पदार्थ घेतात आणि कचरा बाहेर तरी टाकतात नाहीतर गाडीत तरी टाकतात. त्यावेळी मी माझ्या पिशव्या पुढे करतो आणि त्या फिरवून कचरा गोळा करून ठेवतो. मला माहीत आहे की हे जर आपण केलं नाही तर मुंबई पुणे प्रवासातील सर्व दऱ्या विघटन न होणाऱ्या कपांनी भरून जातील. याचं भान आपणच ठेवायला पाहिजे. हे काही फार मोठं कार्य नाही पण पर्यावरणाला छोटासा का होईना, नक्कीच हातभार लावणारं आहे. मन घालून, डोळस नजरेने आजूबाजूला पाहिलं तर अशी केवढीतरी कामं करता येण्यासारखी असतात. काही ठिकाणी रस्त्याच्या पाट्यांचे खांब धक्का बसून तिरके झालेले असतात, ते जाताजाता सरळ करतो. त्यामुळे काही फरक पडतो का, तर नक्कीच पडतो.

कधीकधी मुंबईत खूप पाऊस कोसळतो, तासन तास धारा लागून राहतात.. घरातले तेव्हा त्या पावसाच्या आनंदासाठी गरम गरम कॉफी पित

बसतात. मी त्यातला एक कप, सोसायटीच्या दारात उघड्या चौकीत कुडकुडत बसलेल्या आमच्या वॉचमनाला पाठवतो. तो कित्येक तास आपली ड्यूटी करत असतांना बाहेर पडू शकत नसतो. एवढं जरी लक्षात ठेवलं तरी गरम कॉफीमुळे त्याला मिळणारा आनंद तो माणूस कायम लक्षात ठेवतो. माझा आनंद त्यातच आहे. कॉफीची गोष्ट निघाली म्हणून सांगतो, आमचे शेजारी जेव्हा दूरच्या गावावरून परत येतात, तेव्हा त्यांचं दार उघडलं की आम्ही त्यांना चहा नेऊन देतो, मग ते चहा पिऊन आनंदाने कामाला लागतात. आजारी पडलेल्या कुणा नातेवाईकाला भेटायला जायचं असेल तेव्हा, त्या जर बाई असतील तर मी फळं नेण्याऐवजी, त्यांच्या घरी ४ दिवसांच्या भाज्या घेऊन जातो. त्या घरातील तेवढंच काम मी माझ्या परीने कमी करतो. रोज संध्याकाळी बागेत किंवा देवळात जाऊन बसतो, तेव्हा तिथे असलेला कचरा उचलून टाकतो. चपलांचे ढीग नीट लावतो.

एकदा माझ्या मुलाने त्याला ऑफीसमधे सर्वोच्च पद मिळालं म्हणून आनंदाने घरातील सर्वांना मोठी पार्टी दिली. तीही मुंबईतल्या खूप मोठ्या हॉटेलमधे. तिथलं सगळं चकाचक वैभव पाहून, उत्तम पदार्थांनी पोट भरून आम्ही सगळे मुलाच्या गाडीजवळ आलो, तर कुणीतरी गाडी उघडलेली होती असं लक्षात आलं. मग गाडीत ठेवून गेलो होतो त्या वस्तू शोधल्या. त्या सगळ्या सुखरूप होत्या, पण हरवला होता एक मोठा ब्रेड. माझी त्या हॉटेलच्या वैभवाची झिंग त्या क्षणी उतरली. एका महिन्याचा घरखर्च भागेल एवढं बिल देऊन आम्ही बाहेर पडलो होतो, आणि एका भुकेल्याला, गाडीतील इतर

वस्तूंपेक्षा, ब्रेड मौल्यवान होता हे माझ्या अंत:करणात खूप खोलवर जाऊन रुतलं. त्यानंतर कोणत्याही मोठ्या हॉटेलमधे, वा कुणाच्या पार्टीला जायचं असेल तर त्या अनजान गुरुमुळे, मी त्यादिवशी सकाळी देवळाबाहेरच्या भिकाऱ्यांना लादीपाव वाटून येतो. देशातील उपाशी लोकांची संख्या त्यादिवशी तरी कमी झालेली असते. आता तोच क्रम माझी मुलंही करतात हा जास्त आनंदाचा परतावा.

याच विचाराने मी देशकार्य केलं. देशात अचानक आणीबाणी जाहीर झाली. अनेक ठिकाणी अनेक कारणांसाठी धरपकड झाली. अनेकांना तुरूंगवास दिसला. गजाआड जावं लागलं. सगळा देश या अवचित संकटाने हादरला. घरोघर चाललेलं शांत जीवन क्षणात भूकंपासारखं कोलमडलं. मीही बेचैन झालो. मी या घटकेला काय करू शकतो याचा विचार करू लागलो. काहीतरी करायला हवं एवढं कळत होतं. मग उठलो आणि पक्षाच्या कार्यालयात गेलो. त्यांना म्हटलं की मला काहीतरी करायचंय, मला काहीतरी काम द्या. तुमची पंचाहत्तरी उलटली आहे, तुम्हाला काय काम देणार असं तिथला कार्यकर्ता म्हणाला. मी त्याला म्हटलं की घरात कार्य निघालं की जेवणाची ताट पुसायलाही माणूस लागतो. ते काम काही फार मोठं नसतं पण जरुरीचं असतं. मग बरं म्हणाले, जरूर पडली तर बोलावतो असं म्हणून मला कटवलंच.

चार दिवसांनी निरोप आला. तुरुंगात अडकलेल्यांची पत्रं गुप्तपणे योग्य स्थळी पोचवायची होती. त्यांना माझ्यासारखा सामान्य चेहऱ्याचा माणूस हवा

होता. हे काम गुप्तपणे कराल का अशी विचारणा झाली. मी आनंदाने हो म्हणालो. मग घरी आलो. संध्याकाळी बागेत जाऊन बसायची वेळ, मी सकाळी केली आहे हे जाहीर केलं. संध्याकाळचा ट्रॅफीक हे कारण दिलं. बागही लांबची निवडली. तिथे पोचायचं, सकाळचा पेपर वाचायचा आणि परत यायचं यात बराच वेळ लागणार हे घरच्यांना कळलंच होतं. मग मी आमच्या जवळच्या बसस्टॉपवर उभा राहायला लागलो. त्यातही काही संशयास्पद नव्हतं. कुणीतरी अनोळखी मला पाकिटं आणि ठराविक स्थळांची यादी आणून देऊ लागलं. मी त्या ठिकाणी ती पत्रं, कधी लखोटे, कधी कुटुंबांना लागणारी आर्थिक मदत, पोचवू लागलो. माझं वय, माझं हळूहळू चालणं माझा साधा सदरा आणि लेंगा, साधी कापडी पिशवी कुणाच्याही नजरेत भरत नव्हती. कधीतरी पोलिस येऊन इथे का उभे असं विचारायचे. मी माझ्या मुलाची वाट पाहातो आहे, कधीतरी शुगर टेस्टसाठी डॉक्टरकडे जायचंय असं सांगायला लागलो. पण त्यावेळी माझ्या पिशवीत असलेले कागद मला बॉँम्बगोळयासारखे वाटत. त्यात काय असेल ते मला माहीत नसायचं पण त्या पोलिसाने पाहिलं तर या विचाराने छातीत धडधडायचं. मला त्या क्षणी आपण क्रांतीकारक असल्याचा भास होई. मग भगतसिंग, वासुदेव बळवंत फडके असे अनेक क्रांतीकारक कसे जगले असतील याचा अनुभव येई. कुठल्यातरी थोर नेत्याचे विचार माझ्या या पिशवीत आहेत याचंच दडपण आणि भाग्यही मला जाणवत असे. असे भारावलेले दिवस जगत होतो. हे काम नित्यनेमाने सुरळीत चालू झालं. एक दिवस पक्ष कचेरीतून निरोप आला की आज एक व्यक्ती तुमच्या घरी ४ तास वेळ काढायला येऊ शकेल का? ठेवून घ्यायल का जबाबदारीने? मला काही काळ काय उत्तर

द्यावं ते कळेना कारण अशी कुणाची सुरक्षा अंगावर घ्यायची म्हणजे केवढी मोठी जबाबदारी. पण मी हो म्हणालो.

मग एक दिवस माझी ओळख सांगत एक गृहस्थ माझ्या चाळीतल्या घरी आले. माझं मूळ गाव त्यांना माहीत होतं, म्हणून तिथल्या आठवणींच्या गप्पाही रंगत गेल्या. आम्ही बराच वेळ व्हरांड्यात घालवला. ४ तास ते माझ्यासमोर बसले होते. तिथेच त्यांचं खाणं झालं. चाळीत एक क्षणभरही ते बाहेर गेले नाहीत. कुणाच्याही नजरेला पडले नाहीत. बरोबर ४ तासांनी एकजण आला आणि त्यांना घेऊन गेला. माझी पत्नी हे कोण असं सारखं विचारत होती, तिला गावाकडचा शाळामित्र असं सांगितलं. ४ दिवसांच्या नंतर मला त्या अनोळखी व्यक्तीचं नाव कळलं आणि त्या क्षणी माझा सदरा घामाने थबथबला. केवढी मोठी जबाबदारी मी लीलया पार पाडली होती ते कळलं आणि साक्षात शिवाजी महाराज माझ्या झोपडीत येऊन गेले आहेत हे कळलं. पण त्याचं जे बेमालूम वेषांतर केलेलं होतं ते थक्क करणारं होतं. मला ४ तास त्यांच्यासमोर बसूनही मला कळलं नव्हतं. ते नेते होते की अभिनेते ते मला नक्की सांगत येत नाही. त्यानंतर ती जबाबदारी आणखीनही काही वेळा माझ्यावर येऊन पडली. कधीकधी माझ्या अकाऊंटमधून मी सांगितलेली रक्कम मी काढून घेऊन, सांगितलेल्या गरजू घरी नेऊन देत असे. मग माझ्या अकाऊंटला ते पैसे येत. कधीतरी थोडे जास्तच असत. हे असं कार्य करणारे इतर पक्षातही अनेक होते.

असे ते मंतरलेले दिवस होते. दिवस तणावाचे होते, पेटलेले होते, एकजुटीचे होते, परीक्षा पाहण्याचे होते. आणखीही अशी कामे मी केली पण ती

इथे सांगत बसत नाही. आपल्या भूमातेच्या चरणांना भिजवणाऱ्या अनेक लाटा असतात, मी त्यातली एक छोटी लाट होतो हे माझं भाग्य. नंतर दिवस बदलले. लोकशाहीचं रक्षण लोकांनीच केलं. माझं सकाळी बागेत फिरायला जाणं अचानक थांबलं. पत्नीने विचारलं, बरं वाटत नाही आहे का, हल्ली सकाळचं खूप वेळ, दोन तीन तासाचं फिरायला जाणं अगदी अचानक बंद का केलंत? मी म्हणालो, देशाला पक्षाघात झाला होता, देश त्यातून बाहेर आला आता माझीही तब्येत सुधारली. पत्नीला काहीच कळेना तेव्हा मी काय करत होतो, आमच्या घरी येऊन गेलेला शाळासोबती कोण होता, हे सर्व सांगितलं तेव्हा कुणाचाच विश्वास बसेना. पण आता उलट झालंय. घरात मी बाहेर जाऊन उशीरा येईन म्हणालो की की देशकार्य नाही ना काही असं लगेच विचारतात.

अशी कथा आहे की खारीच्या इवल्याश्या कामावर खूष होऊन रामाने तिच्या पाठीवर आपली तीन बोटांचे पट्टे सन्मान म्हणून उठवले. श्रीरामाने जे ओळखलं तेच पक्षासाठी मी केलं. मोत्यांच्या सरामधे मुख्य पदकाजवळचे पाणीदार मोती लोकांच्या नजरेत ठसतात, कौतुकाचा विषय ठरतात पण सराच्या मागच्या बाजूला, मानेवर लपलेले मोती कुणाला दिसत नाहीत. मी त्या मोत्यांपैकी होतो. माझं भाग्य एवढंच की त्या मुख्य सरातला मी एक छोटा का होईना पण सराचं मूल्य वाढवणारा होतो.

आज पक्षाने माझा सत्कार करून माझ्याही पाठीवर दिलेली ही शाल आणि कौतुकाची थाप मला खारीच्या पट्ट्यासारखीच अनमोल आहे.

नमस्कार.


दादांचं हृदयातून पाझरणारं, ओघवतं भाषण संपलं आणि मग टाळयांचा कडकडाट झाला. चाळीतील शेजाऱ्यांना आज दादांची नव्याने ओळख झाली होती.

--------------------------------------------


**ई साहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केलेली**


**डॉ. स्मिता दामले यांची इतर 10 पुस्तके**


**ONE** click on cover/ Book will **OPEN**






इतिहासाची
विलग
पाने
डॉ. स्मिता दामले


डॉ. स्मिता दामले
कावेरीचा
दुभंग



डॉ. स्मिता दामले
एका
ओथमनचा
अंत



डॉ. स्मिता दामले
कलाटणी
KUSHAN
SATAVAHANA
EMPIRE
PANDYAN
KINGDOM
CHOLAS


डॉ. स्मिता दामले
असं
घडलं
होतं


डॉ. स्मिता दामले
सल्तनत-ए-दिल्ली


डॉ. स्मिता दामले
नक्षा


मनसोक्त
डॉ. स्मिता दामले


डॉ. स्मिता दामले
सूर्यपुत्र
लोकमान्य

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १५ वे वर्ष.

## डॉ. स्मिता दामले यांचे हे अकरावे पुस्तक.

डॉ. स्मिता दामले या मध्ययुगीन इतिहासावरील सुप्रसिद्ध विद्वान आहेत. हल्लीच्या गुगगल पंडितांच्या काळात असे मूळ बखरी व दस्त वापरून इतिहास अभ्यासणारे विरळाच. त्याचबरोबर त्यांची इतिहासलेखनाची एक ओघवती शैली आहे. त्यांची अनेक पुस्तके वाचकांनी अभ्यासली आहेत. डॉ. दामले यांच्यासारख्या ज्येष्ठ साहित्यिका आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१६), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(११), डॉ. नितीन मोरे (४४), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (१०), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(४२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA

पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२७), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१२), श्याम कुलकर्णी(१४), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (६), प्रवीण दवणे, आर्या जोशी, सरोज सहस्रबुद्धे (७) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।